। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २७३ वा । बुधवार दिनांक १४ जानेवारी, २०२६ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### चांदीचे दागिणे व रोख रकमेची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी जयंत बाळकृष्ण महाजन, वय ६७ वर्षे, रा. महाजन गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव ह.मु. थेरगाव फाटा पिंपरी चिंचवड पुणे यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने तोडून आत प्रवेश करुन कपाटातील चांदीचे दागिने एकुण ११,००० किंमतीचे चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-जयंत महाजन यांनी दि.१२.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(३), ३३१(४), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### बलसुर येथून मोटारसायकलची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी न ज्ञानेश्वर बाबुराव निलंगे, वय ३५ वर्षे, रा. बलसुर ता. उमरगा जि. धाराशिव यांची अंदाजे ३०,००० किंमतीची मोटरसायकल बलसुर ते सास्तुर जाणारे रोडजवळील बलसुर शिवारातील पुला जवळून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-ज्ञानेश्वर निलंगे यांनी दि.१२.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

उमरगा (प्रतिनिधी)- बेबा रा.कवठा ता. उमरगा जि. धाराशिव या दि.१२.०१.२०२६ रोजी आपल्या राहत्या घरासमोर कवठा येथे अंदाजे २,५०० किंमतीची २५ लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर प्रकाश रा.कसगी ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१२.०१.२०२६ रोजी आळंगा जाणारे रोडच्या बाजूला प्रकाश यांचे घरासमोर कसगी येथे अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर फिरोज रा.मोमीन गल्ली उमरगा ता. उमरगा जि. धाराशिव हे दि.१२.०१.२०२६ रोजी चैतन्य बारचे पाठीमागे उमरगा येथे अंदाजे ४,००० किंमतीची ४० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत.

### धाराशिव पोलिसांची तडतोड शुल्क वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.१२ जानेवारी रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण १३९ कारवाया करुन १,१५,५०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## आदिवासी पारधी समाजाच्या घरकुलांसाठी आवश्यक कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करुन देण्याची जिल्हाधिकारी यांची ग्वाही

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- शबरी आवास योजनेअंतर्गत जिल्हाधिकारी कीर्ति किरण पुजार यांच्या अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक मंगळवार, दि.१३ जानेवारी रोजी पार पडली. या बठकीत आदिवासी पारधी समाजाच्या घरकुलांसाठी आवश्यक कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करुन देण्याची जिल्हाधिकार्यांची ग्वाही जिल्हाधिकारी श्री. पुजार यांनी दिली.

जिल्हाधिकारी श्री.पुजार यांच्या अध्यक्षतेखाली धाराशिव शहरातील पापनास नगर येथे पारधी वस्तीस मूलभूत सोयीसुविधा व वस्तीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आयोजित मंगळवारी दुपारी बैठक घेण्यात आली. बैठकीस आदिवासी पारधी समाज संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सुनील काळे, उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे अक्षय बिरादार, आर. पी. कोलगणे, धाराशिवच्या तहसीलदार डॉ. मृणाल जाधव, परंड्याचे तहसीलदार निलेश काकडे, धराशिव नगर परिषदेच्या सीओ निता अंधारे, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी धनंजय झाकर्डे,दत्ता बीरू काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शहरी शबरी घरकुल योजनेंतर्गत माहिती देण्यात आली. धाराशिव शहरातील पारधी वस्ती, मधील ४४ प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झालेले असून सदर ४४ प्रस्तावांना लक्षांक नुसार ४४ लाभार्थ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे. मंजूर ४४ लाभार्थ्यांचे ४३ घरे पुर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित ०१ घरकुले प्रगतीपथावर आहेत.

सन २०२४-२५ करिता शबरी आदिवासी घरकुल (शहरी) योजनेंतर्गत धाराशिव शहरातील पारधी वस्तीमधील ३४५ प्रस्ताव प्राप्त झालेले असून सदर ३४५ प्रस्तावांना लक्षांक नुसार ३४५ लाभार्थ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे. मंजूर ३४५ घरकुलापैकी २४४ घरकुल पुर्ण झालेली असुन १०१ घरकुले प्रगतीपथावर आहेत.

त्याचबरोबर पापनाश नगर येथील पारधी वस्तीस मुलभुत सोयीसुविधा व वस्तीचा सर्वांगीण विकास करण्यासाठी कामे प्रस्तावित करण्यात आली. यामध्ये नगरपालिकेमार्फत ३८९ लाभार्थ्यांना ८-अ उपलब्ध करुन देणे, पारधी वस्तीस पाणीपुरवठ्याची सोय



करुन देणे, वस्तीच्या परीसरामध्ये खुली व्यायामशाळा तयार करणे व इनडोअर जिम विकसित करणे, वस्तीच्या सर्व घरकुलांकरीता सौर उर्जेवरील सौर ऊर्जा पॅनेलची सुविधा देणे, वस्तीस पोहच रस्ता व अंतर्गत रस्त्यांचा विकास करणे, ३८९ कुटुंबांना घराच्या आतील व बाहेरील बाजुस प्लॅस्टर करणेसाठी प्रती घरकुल किमान ५ ब्रास वाळु उपलब्ध करुन देणे याबाबत चर्चा करण्यात आली. त्याचबरोबर भूम शहरातील आदिवासी पारधी समाज बांधवांसाठी जागा आणि बांधकाम साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत निर्णय घेण्यात आला.

आदिवासी पारधी समाजातील डॉक्टर, वकिलांचा सत्कार

याच कार्यक्रमात आदिवासी पारधी समाजातून हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण घेऊन डॉ. झालेले दीपक नीळकंठ पवार आणि प्रख्यात वकील ॲड. शंकर धनाजी काळे यांचा जिल्हाधिकारी श्री. पुजार यांच्या हस्ते पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.

## अवैध तंबाखु पानमसाला व सिगारेट विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)- तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत खंडेराव वय ३८ वर्षे,रा. तिर्थ बुद्रुक ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१२.०१.२०२६ रोजी जुने बसस्थानकसमोरील देवराज कॉम्पलेक्स मध्ये जगदंबा पान शॉप मध्ये तुळजापूर येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ विमल पान मसाला, डायरेक्टर पान मसाला एकुण ९६० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना तुळजापूर पोलीसांना मिळून आला. तर ताजोद्दीन वय २५ वर्षे,रा. शिवरत्न नगर, तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१२.०१.२०२६ रोजी तुळजापूर खुर्द कडे जाणारे रोडलगत संभाजीराजे पान शझॅप मध्ये तुळजापूर येथे महाराष्ट्रात शासनाचे प्रतिबंधीत केलेला तत्सव पदार्थ डायरेक्टर पान मसाला एकुण ७२० किंमतीचे विक्री करीता जवळ बाळगलेला असताना तुळजापूर पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी गुटखा साहित्यासह जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द कलम- कलम ६ (अ),२४ सिगारेट व इतर तंबाखु उत्पादन जाहितरातीस प्रति व वाणिज्य पुरवठा विनीमय अधिनियम २००३ अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे स्वतंत्र २ गुन्हे नोंदवले आहेत. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## १४ मार्चला जिल्ह्यात सर्व न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालत

धाराशिव (जिमाका)-राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय,नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण,मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवार,१४ मार्च २०२६ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.या लोकअदालतीत मोटार वाहन अपघात प्रकरणे,कौटुंबिक प्रकरणे, वीज वितरण कंपनीशी संबंधित प्रकरणे, दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे तसेच बँका आणि वीज वितरण कंपन्यांची दाखलपूर्व प्रकरणे यांचा समावेश करण्यात येणार आहे.

याशिवाय कौटुंबिक न्यायालय आणि ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रकरणे देखील या लोकअदालतीत तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहे. लोकअदालतीमध्ये प्रकरण तडजोडीने मिटविल्यास संबंधित पक्षकारास भरलेली न्यायालयीन फी परत मिळते.नागरिकांनी आपापसातील वाद सामोपचाराने मिटवून वेळ,पैसा आणि मानसिक ताण-तणाव वाचवावा,असे आवाहन करण्यात आले आहे. राष्ट्रीय लोकअदालतीचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा,असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्रीमती अभिश्री देव व सचिव श्रीमती भाग्यश्री पाटील यांनी केले आहे. आपली प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यास इच्छुक नागरिकांनी जिल्हा न्यायालयातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,उस्मानाबाद किंवा संबंधित तालुका विधी सेवा समिती येथे संपर्क साधावा.अधिक माहितीसाठी ८५९१९०३६२५ या दूरध्वनी क्रमांकावर किंवा dlsaosd25gmail.com या ई-मेलवर संपर्क साधावा. प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यासाठी पक्षकारांनी आपल्या वकिलांशीही संपर्क साधावा,असेही कळविण्यात आले आहे.

## श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचे विचार विविध घटकांपर्यंत पोहोचवावे-निवासी उपजिल्हाधिकारी श्री विद्याचरण कडवकर



धाराशिव (जिमाका) शीख धर्माचे ९ वे गुरु श्री गुरू तेग बहादूर साहिब जी यांनी १७ व्या शतकात तेव्हाच्या शासनकर्त्यांच्या अन्याय व अत्याचाराविरुद्ध आवाज उठवला. त्यांनी मानवी हक्कांसाठी बलिदान देऊन देशाच्या सांस्कृतिक व आध्यात्मिक अस्मितेचे रक्षण केले. त्यांच्या ३५० व्या शहीदी समागम शताब्दी वर्षानिमित्त त्यांचा गौरवशाली इतिहास माहीत व्हावा, त्यांनी केलेला प्रचार व दिलेले बलिदान याचे स्मरण होण्यासाठी त्यांचे विचार समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्ह्यात विविध कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात यावे.असे आवाहन जिल्हास्तरीय समितीचे नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या कक्षात हिंद- दि- चादर श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांच्या ३५० व्या शहीद समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत श्री कडवकर बोलत होते.या बैठकीला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शैलेंद्र चौहान,अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.तानाजी लाकाळ,जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी पुंडलिक गोडसे,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे,जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) अनंत कुंभार,अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. व्ही.व्ही.कुलकर्णी,उपशिक्षणाधिकारी दत्तात्रय लांडगे,पोलीस निरीक्षक श्री. भुजबळ,मोटार वाहन निरीक्षक विकास डोंगरे व बहुजन कल्याण विभागाचे व्ही.एच.राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्री.कडवकर म्हणाले की.श्री गुरु तेग बहादूर साहीब जी यांच्या जीवन कार्यावर शाळा,विद्यालय आणि महाविद्यालयस्तरावर निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात.स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना मुख्यमंत्री,पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे.या आयोजनासाठी शिक्षण विभाग व विद्यापीठाच्या धाराशिव येथील उपकेंद्रने पुढाकार घेऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे तसेच श्री गुरु तेग बहादूर साहीब जी यांच्या जीवन कार्यावर चित्ररथाच्या माध्यमातून माहिती देण्यात येणार आहे.जिल्ह्यातील चित्रपटगृहातून गायक सरताज यांचे गीत दाखविण्यात येणार आहे. तसेच त्यांच्या जीवनावर आधारित माहितीपट दाखविण्यात येणार आहे असे श्री.कडवकर यांनी यावेळी सांगितले.

श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचे इतर समाजाची असलेले जिव्हाळ्याचे संबंध या विषयावर पथनाट्यांचे शाळा व विद्यालयस्तरावर आयोजन करण्यात यावे असे सांगून श्री. कडवकर म्हणाले की,शाळास्तरावर प्रभात फेरी काढण्यात यावी. जिल्ह्यात असलेल्या शीख, सिकलीकर,बंजारा-लबाना, मोहियाल,सिंधी व इतर समाजापर्यंत हिंद दि चादर श्री गुरु तेग बहादुर साहीब जी यांचे विचार पोहोचविण्याचे काम विविध कार्यक्रमातून करण्यात यावे.नांदेड येथे २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित ३५० व्या शहिदी समागम शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रमाला जाण्यासाठी इच्छुक असलेल्या जिल्ह्यातील समाज बांधवांसाठी आरटीओ विभागाने दानशूर व्यक्ती किंवा सीएसआरच्या माध्यमातून वाहनाची व्यवस्था तसेच लंगर,पाणी व्यवस्था करण्यात यावी. धाराशिव येथील आरोग्य विभागाने नांदेड येथे वैद्यकीय अधिकारी- कर्मचारी व रुग्णवाहिकेसह आपले पथक पाठवण्याची व्यवस्था करावी असे ते यावेळी म्हणाले.

## धाराशिव नगरपालिकेचा आदर्श कारभार : विकास स्वच्छता आणि नागरिक सेवेचा नवा मानदंड

धाराशिव (अंजुम शेख ) धाराशिव नगरपालिकेचा सध्याचा कारभार हा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शक ठरत आहे. नागरिकांच्या दैनंदिन गरजा पासून ते शहराच्या दीर्घकालीन विकासा पर्यंत प्रत्येक बाबतीत नियोजनबद्ध व पारदर्शक पद्धतीने कामकाज सुरू आहे. स्वच्छता, पाणीपुरवठा, रस्ते, ड्रेनेज, सार्वजनिक सुविधा आणि आरोग्य सेवा या सर्व आघाड्यावर नगरपालिकेने ठोस पावले उचललेली आहेत. शहरातील स्वच्छता मोहिमेला विशेष गती देण्यात आली असून कचरा संकलन व व्यवस्थापन प्रभावीपणे राबवले जात आहे. पाणीपुरवठा अधिक नियमित करण्यासाठी दुरुस्ती व नव्या लाईन टाकण्याचे काम सुरू आहे. अंतर्गत रस्त्याचे मजबुतीकरण गटारीचे स्वच्छता आणि स्ट्रीट लाईटची व्यवस्था यामुळे नागरिकाचा त्रास कमी झाला आहे. नगरपालिका प्रशासन नागरिकाच्या तक्रारींना तात्काळ प्रतिसाद देत असून ऑनलाईन व थेट अर्ज प्रणालीमुळे कामकाजात पारदर्शकता वाढली आहे. विकास कामासोबत सामाजिक बांधिलकी जपत आरोग्य शिबिरे वृक्षारोपण आणि जनजागृती उपक्रमही राबविले जात आहेत. एकूणच धाराशिव नगर पालिकेचा कारभार हा केवळ कागदावरच नाही तर प्रत्यक्षात नागरिकाच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवणारा ठरत आहे. नियोजन कार्यक्षमता आणि लोकाभिमुखी दृष्टिकोनामुळे धाराशिव शहर विकासाच्या वाटचाल जोरदार करत आहे असे सर्व नागरिकांतून बोलले जात आहे की, भाजपच्या ताब्यामध्ये नगरपालिका आल्यामुळे व राणा दादाच्या विचारामुळे नगरपालिकेचा कारभार खरंच पारदर्शक झालेला आहे यात कुठलीही शंका नाही.

## जळकोट ग्रामपंचायत येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी




जळकोट(विजय पिसे)- तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत कार्यालय येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथमता मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पुष्पहार घालून पूजन करण्यात आले. व याचेच औचित्य साधून ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील सेवानिवृत्त शिक्षक शेषेराव शिवाजी कदम व नंदगाव येथून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षिका अनुसया आवटे व तसेच तक्रार निवारण समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल कस्तुराबाई कारभारी यांचा शाल, फेटा व पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. व पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी मान्यवरांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर आपले अनमोल विचार व्यक्त केले.

यावेळी सरपंच गजेंद्र कदम, ग्रामपंचायत सदस्य महेश कदम, बसवराज कवठे,अनिल छत्रे, बसवराज भोगे, कृष्णात मोरे, तंटामुक्ती अध्यक्ष यशवंत कदम, पत्रकार विजय पिसे, दत्तात्रय चुंगे, कुमार चुंगे, डी .डी. कदम सर, चंद्रकांत स्वामी, प्रसाद हतै, श्रीकांत राजमाने, नामदेव कागे, दिनकर कदम, सदाशिव हासुरे आदी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मागील भांडणाचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, दगड व कोयत्याने मारहाण

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत ब्रम्हदेव, धुळदेव, सुरजे, सर्व रा. भोत्रा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१२.०१.२०२६ रोजी भोत्रा येथील शेत गड नं २०(ब) येथे फिर्यादी नामे-राजेंद्र ज्ञानदेव शिंदे, वय ३० वर्षे, रा.भोत्रा ता. परंडा जि. धाराशिव यांना नमुदांनी मागील भांडणाचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, दगड व कोयत्याने मारहाण करुन जखमी केले. जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राजेंद्र शिंदे यांनी दि.१२.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे परंडा येथे गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## आरोप-प्रत्यारोपाने कहरच केला..

राज्यातील महानगरपालिकेची निवडणुक प्रचारात सर्वच पक्षांनी मोठी आघाडी घेतली. आपली भुमिका जनतेला पटवुन सांगण्याचा प्रयत्न केला. याचा परिणाम सोळा तारखेला कळून येणार आहे. राष्ट्रीय तसेच प्रादेशिक पक्षाने जीव लावून प्रचार केला. जनतेचे मुलभूत प्रश्न तसे नवीन दिसून आले नाहीत. दर पाच वर्षांनंतरही तेच समस्या नागरिकांच्या दिसून आल्या. त्याच प्रमाणे महानगरपालिकेत एकाची सत्ता, सत्तर वर्षात कायम नसतानाही समस्या कायम आहेत. सत्ता बदलली गेली. कधी काँग्रेस तर कधी डावे तर भाजपा, शिवसेना अशी सत्ता फिरली. असे असताना समस्या का सोडविल्या नाहीत. त्याच-त्या समस्या दिसून का येतात? यावर चिंतन झाले पाहिजे. याला जबाबदार त्या-त्या काळातील प्रशासन आहे का नगरसेवक आहेत? समस्या पुर्ण नाही सुटल्या तरी काही प्रमाणात सुटल्या पाहिजेत. किमान पिण्याचा पाण्याचा प्रश्न सोडविला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे नियोजन आहे. नियोजनाचा मोठा अभाव दिसून येतो. अनेक ठिकाणी पाणी आहे. पाण्याची सुविधा आहे. तरी पाण्याचा दुष्काळ दिसून येत आहे. स्वच्छता ही सर्वात मोठी समस्या शहरात भेडसावते. महानगरपालिकेचे कर्मचारी पुर्वी स्वच्छता करीत असत ते सेवानिवृत्त झाले असतील किंवा त्यांच्या जागी नवीन भरती नसेल म्हणून खाजगी सेवा पुरविणाऱ्या संस्थेकडे स्वच्छतेचे कॉन्ट्रक्ट दिले गेले. असे असताना स्वच्छते बाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. अनेक वर्ष प्रशासकिय काळ होता. त्यात ही काही ठिकाणी परिस्थिती सुधारली तर काही ठिकाणी ढासळली गेली. आता लोकनियुक्त नगरसेवक निवडूण आल्यावर मोठ्या प्रमाणात महानगरपालिकेत बदल होण्याची शक्यता आहे. नगरसेवकांना जर महानगरपालिकेतील पुर्वीचा अनुभव असेल तर मोठ्या प्रमाणात विकासाची कामे करून दाखवितील. मुळात आपल्या प्रभागात कोणती विकासाच्या कामाबाबत आश्वासने दिली त्यानुसार जनतेनी विजयी नगरसेवकाकडून करून घेण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. वास्तविक शहरे ही दुर्लक्षित होत आहेत. ग्रामीण भागाकडे जसे सरकारचे लक्ष असते तसे महानगराकडे कमी दिसून येते. ग्रामीण भागात विकासाची कामे कमी प्रमाणात असतात कारण क्षेत्र कमी असते तसे शहराचे नसते. शहराची हद्द ही वाढती असते. नवीन वसाहत सामिल होत असतात. नवीन वस्ती समिल झाली की, त्यांना मुलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी महानगरपालिकेची असते. त्यात महानगरपालिकेचे स्थिर उत्पन असावे लागते. स्थिर उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण केली पाहिजेत. स्थिर उत्पन्न म्हणजे वाणिज्यगाळे, उद्यान, पर्यटनस्थळे अशा विविध उत्पन्नात भर घालणाऱ्या बाबी असणे आवश्यक आहे. राज्यात काही महानगरपालिकेस उत्पन्न बऱ्यापैकी आहे. मालमत्ताकराच्या रुपाने मोठा निधी जमा होतो तो विकासावर खर्च केला जातो. त्यामुळे मुळात महानगरपालिका आर्थिकदृष्ट्या कशी सक्षम होईल याचा विचार झाला पाहिजे. सतत सरकारकडून अर्थिक निधी मागण्यापेक्षा स्वबळावर महागनरपालिक अर्थिकदृष्टया सक्षम कशी होईल याचा विचार आगामी काळात होणे अपेक्षित आहे. सध्याला सर्वच पक्षाने वचन तसेच जाहिरनामे प्रसिद्ध केले आहेत. त्यात अनेक आश्वासने दिली आहेत. ती पाळावित असे संकेत आहेत. अधिक प्रमाणात ती पाळतात तर काही जण निवडूण आल्यावर विसर पडतो. तो पडू नये या बाबत सतर्क राहाणे ही नागरिकांची जबाबदारी आहे. तसे पाहिले तर फार मोठ्या शहराच्या समस्या नसतात. ज्या चारपाच मुलभूत सुविधा असतात त्याकडे लक्ष दिले पाहिजे, तरच जनता समाधानी राहू शकते. त्याच प्रमाणे अनेक महानगरपालिका ह्या मुलभूत सुविधा देत नाहीत तरी मोठ्या प्रमाणात मालमत्ता कराची वसुली केली जाते. आलिकडे मोठया प्रमाणात कर वाढलेले आहेत. जनता कर देण्यात मागेपुढे पाहात नाही. जनतेला सुविधा दिल्या तर प्रामाणिक कराचा भरणा करते. आलिकडे दंड लावला जातो. पुर्वी असा प्रकार नव्हता. ही सावकारी पद्धत बंद केली पाहिजे. ंदंड कशासाठी? मुळात तीनशे पासष्ट दिवस पाणी पुरवठा केला जातो का किंवा वर्षभर स्वच्छता केली जाते का? जर काही महिणे किंवा दिवस जर सुट्टी घेतली त्या दिवसाचा कर माफ केला पाहिजे. आठवड्याला एक दिवस म्हणजे महिण्याला चार ते पाच वेळा पाणी सोडायाचे व वर्षभराचा कर आकाराचा हे योग्य नाही. उलट दंडाची सक्ती कशासाठी? या बाबत नवीन निर्वाचित नगरसेवकांनी विचार केला पाहिजे. मुळात आपल्या प्रभागात चार किंवा तीघांजणाास निवडूण द्यावयाचे आहे. त्यामुळे काळजीपुर्वक मतदान होणे अपेक्षित आहे. प्रत्येकांनी मतदान केले पाहिजे. मतदान करणे म्हणजे लोकशाही जीवंत ठेवण्यासारखे आहे. मतदानाचा हक्क न बजावणे योग्य नाही. आपण आपला प्रतिनिधी महानगरपालिकेत पाठविणे व आपल्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. नगरसेवकाची निवडणुक ही तशी महत्वाची आहे. आपल्या जवळचा एक प्रतिनिधी निवडयाचा असतो. शहारातील मतदार हा हुशार समजला जातो. तो विचारपुर्वक मतदान कराणारा असा समजला जातो. त्यामुळे प्रत्येक मतदार नागरिकांची मोठी जबाबदारी आहे की, मतदान केले पाहिजे. मतदान करण्याचा आग्रह इतरांना केला पाहिजे. मताची टक्केवारी वाढली पाहिजे. एकतर सरकारने सुट्टी जाहिर केली आहे. मतदानास किती वेळ किती लागतो. एक तासाच्या आत मतदानास वेळ लगातो. एक तासाच्यावेळत पाच वर्ष आपले प्रतिनिधी निवडायाचे असतात. आळस केला तर पाच वर्ष पश्चतापात काढावे लागणार आहेत. त्यामुळे वेळ काढून मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. काही झाले तरी मतदानानापासून कोणी वंचित राहू नये. या बाबत जनजागृती आवश्यक आहे ती करणे मतदार नागरिकांचे कर्तव्य आहे. मतदानाची टक्के चांगल्या प्रमाणात वाढली पाहिजे. शहरात मतदानाची टक्केवारी वाढत नाही असे ओरड होते, ती दूर करण्याचा प्रयत्न यावेळी झाला पाहिजे. मतदान मोठ्या प्रमाणात व्हावे. आपल्या पसंतीचा उमेदवार निवडला गेला पाहिजे. तेंव्हा मतदानास बाहेर पडणे आवश्यक आहे. मतदान करणे म्हणजे लोकशाही वृदिंगत करणे आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

# मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना शेतकऱ्यांच्या विकासाचा नवा महामार्ग



महाराष्ट्र हे कृषीप्रधान राज्य आहे. राज्यातील बहुतांश लोकसंख्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे.पेरणीपासून ते कापणी,मळणी आणि शेतीमाल बाजारात पोहोचविण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्याला सक्षम व सोयीस्कर पायाभूत सुविधांची गरज असते. यामध्ये शेतापर्यंत जाण्यासाठी असणारे शेत / पाणंद रस्ते अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात.मात्र,आजही अनेक गावांमध्ये हे रस्ते अतिक्रमणामुळे अरुंद झालेले,निकृष्ट दर्जाचे किंवा पूर्णतः वापरण्यायोग्य नसल्याचे वास्तव आहे.

यांत्रिकीकरणामुळे शेतीतील यंत्रसामग्रीचा वापर वाढला असला तरी योग्य रस्त्यांच्या अभावामुळे त्या यंत्रांचा प्रभावी वापर करणे शेतकऱ्यांसाठी कठीण ठरत आहे.या पार्श्वभूमीवर ग्रामीण भागातील शेत / पाणंद रस्त्यांचे मजबुतीकरण,अतिक्रमणमुक्ती आणि दर्जे दार बांधकामासाठी राज्य शासनाने एक महत्त्वाकांक्षी आणि स्वतंत्र योजना जाहीर केली आहे,ती म्हणजे ''मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना''.

योजनेची गरज आणि पार्श्वभूमी शेत / पाणंद रस्ते हे सहसा मुख्य रस्ते योजनांमध्ये समाविष्ट नसतात. त्यामुळे त्यांची दुरवस्था दीर्घकाळ दुर्लक्षित राहते. अनेक ठिकाणी या रस्त्यांवर अतिक्रमण झालेले असून पावसाळ्यात ते चिखलमय, तर उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य असते. परिणामी शेतकऱ्यांचा वेळ,खर्च आणि श्रम वाढतात.ही समस्या लक्षात घेऊन दिनांक ७ डिसेंबर २०२५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत राज्यातील ग्रामीण भागातील शेत / पाणंद रस्त्यांच्या मजबुतीकरणासाठी स्वतंत्र योजना राबविण्याचा ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला.या निर्णयातूनच ''मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना'' अस्तित्वात आली.

ही योजना केवळ रस्ते बांधण्यापुरती मर्यादित नसून,ती शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करणारी आहे.पूर्णपणे यंत्रसामग्रीच्या सहाय्याने जलद गतीने कामे सोपी,सुलभ आणि प्रभावी कार्यपद्धतीची आहे.अतिक्रमणमुक्त आणि बारमाही वापरण्यायोग्य रस्ते गुणवत्तेवर विशेष भर आणि दोष निवारण कालावधीची तरतूद आणि कार्यान्वयीन यंत्रणा या योजनेअंतर्गत रस्त्यांची कामे विविध यंत्रणांमार्फत करता येणार आहेत.त्यामध्ये ग्रामपंचायत,पंचायत समिती,जिल्हा परिषद बांधकाम विभाग, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजना विभाग,वन विभाग (ज्या ठिकाणी वनजमीन आहे तेथे) तसेच नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचा समावेश आहे.त्यामुळे स्थानिक गरजेनुसार योग्य यंत्रणेमार्फत कामे करणे शक्य होणार आहे.

शेत / पाणंद रस्त्यांच्या कामांना तांत्रिक मान्यता देताना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमावलीनुसार अधिकार देण्यात आले आहेत.वनजमिनीच्या बाबतीत वन विभागामार्फत मान्यता देण्यात येणार आहे.प्रत्येक रस्त्याच्या कामासाठी स्वतंत्र प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार विधानसभा क्षेत्र समितीचे सदस्य सचिव असलेल्या उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आले आहेत.यामुळे निर्णयप्रक्रिया वेगवान होणार आहे.

निविदा प्रक्रिया व देयके २५ कि.मी. लांबीचा क्लस्टर तयार करून निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. जिल्हास्तरीय समितीने पात्र ठरविलेल्या कंत्राटदारांनाच निविदेत सहभागी होता येणार आहे.काम पूर्ण झाल्यानंतर तांत्रिक यंत्रणेने प्रमाणित केलेली देयके उपविभागीय अधिकारी अदा करणार आहेत.निधीची उपलब्धता बहुआयामी स्रोत- या योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष उघडून शासनाकडून अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येणार आहे.याशिवाय निधी,विविध योजना व अनुदाने यांचे अभिसरण करून निधी उभारण्याची मुभा देण्यात आली आहे.१५ वा वित्त आयोग, खासदार/ आमदार निधी, जिल्हा खनिज प्रतिष्ठान निधी,ग्रामपंचायतीचे स्वउत्पन्न, पेसा निधी,ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम,भगवान बिरसा मुंडा जोडरस्ते योजना अशा अनेक स्रोतांचा प्रभावी वापर करण्याची संधी या योजनेत उपलब्ध आहे.

अतिक्रमणमुक्ती कठोर पण आवश्यक निर्णय गाव नकाशांवर दर्शविण्यात आलेल्या शासकीय रस्त्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी स्पष्ट व कठोर कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. तहसीलदारांनी ७ दिवसांची नोटीस देऊन अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करावी, अन्यथा शासन स्तरावरून अतिक्रमण हटविण्यात येणार आहे.या प्रक्रियेत पोलीस बंदोबस्तासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही,ही बाब विशेष महत्त्वाची आहे.गुणवत्ता,पर्यावरण आणि शाश्वतता या योजनेत रस्त्यांच्या गुणवत्तेवर विशेष भर देण्यात आला आहे.खडी,मुरूम यांची तपासणी, अनिवार्य करण्यात आले आहे. शेत / पाणंद रस्त्यांच्या दुतर्फा मनरेगा अंतर्गत वृक्ष लागवड करणे बंधनकारक असून यामुळे पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळणार आहे.

ग्रामपंचायत,महसूल व पोलीस यंत्रणेची जबाबदारी योजना यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत,महसूल यंत्रणा आणि पोलीस विभाग यांची स्पष्ट जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. ग्रामपंचायतींनी रस्त्यांचा आराखडा तयार करणे,महसूल यंत्रणेने अतिक्रमणमुक्ती व समन्वय साधणे,पोलीस विभागाने आवश्यक तेथे तात्काळ मदत उपलब्ध करून देणे या त्रिसूत्री समन्वयामुळे योजना प्रभावीपणे राबविणे शक्य होणार आहे.

समित्यांची भूमिका आणि नियोजन जिल्हास्तरीय व विधानसभा क्षेत्रस्तरीय समित्यांमार्फत योजनेचा आढावा,निधी संकलन,अडचणींचे निराकरण आणि कामांच्या गुणवत्तेवर देखरेख करण्यात येणार आहे.दर तीन महिन्यांनी आढावा बैठक घेणे बंधनकारक आहे.

''मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना''ही केवळ पायाभूत सुविधा विकासाची योजना नसून ती शेतकऱ्यांच्या आर्थिक,सामाजिक आणि मानसिक सक्षमीकरणाचा पाया आहे.शेतापर्यंत पोहोचणारे दर्जेदार,अतिक्रमणमुक्त आणि बारमाही रस्ते उपलब्ध झाल्यास शेतीचा खर्च कमी होईल,उत्पादन वाढेल आणि शेतकऱ्यांचा बाजाराशी थेट संपर्क सुलभ होईल.ही योजना यशस्वीपणे राबविली गेल्यास ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळेल आणि खऱ्या अर्थाने ''बळीराजा'' सशक्त होण्यास मदत होणार आहे.

**संकलन**
**जिल्हा माहिती कार्यालय**
**धाराशिव**

# धर्मस्वातंत्र्य, सहिष्णुता आणि मानवतेचे कालातीत प्रतीक : गुरु तेग बहादूर साहिब -सचिन अडसूळ

भारतीय इतिहासातील धर्मस्वातंर्त्य, सहिष्णुता आणि मानवतेच्या मूल्यांचा विचार केला, तर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे नाव अत्यंत गौरवाने घेतले जाते. शीख परंपरेतील नववे गुरु असलेल्या गुरु तेग बहादूर साहिब यांचा जन्म एप्रिल १६२१ मध्ये अमृतसर येथे झाला. मूळ नाव त्याग मल असलेल्या गुरुजींनी लहान वयातच शौर्य, वैराग्य आणि आध्यात्मि क प्रगल्भतेचा परिचय दिला. एका युद्धातील अतुलनीय पराक्रमामुळे त्यांना 'तेग बहादूर'अर्थात तळपती तलवार- ही उपाधी प्राप्त झाली. १६६४ मध्ये ते शीख गुरु पदावर विराजमान झाले. त्यांनी आसामपासून काश्मीरपर्यंत कार्य करत सत्य, करुणा, संयम आणि निर्भयतेचा संदेश दिला. त्यांच्या ११६ पद्यांचा सम ावेश आजही गुरु ग्रंथ साहिबमध्ये असून, मानवतेचा आवाज म्हणून ती गुरुवाणी काळाच्या पलीकडे उभी आहे.

३५० व्या शहिदी वर्षानिमित्त महाराष्ट्र शासनाने 'हिंद दी चादर' हा राज्यस्तरीय उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रम ाचा उद्देश गुरु तेग बहादूर साहिब यांचे जीवन, विचार आणि बलिदान केवळ धार्मिक चौकटीत न ठेवता सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय प्रेरणा म्हणून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे हा आहे. धर्मस्वातंर्त्य, सहिष्णुता, विविधतेतील एकात्मता आणि मानवतेचा आदर ही म ूल्ये आजच्या पिढीपर्यंत पोहोचवणे, हाच या उपक्रमाचा गाभा आहे. या कार्यक्रम ाच्या आयोजनात सिख समाजासह गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ऐतिहासिक कर्तुत्वाचे साक्षीदार आणि गुरु ग्रंथ साहिब मध्ये संदर्भ असलेल्या सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल, वाल्मीकि, भगत नामदेव व उदासीन समाज-संप्रदाय यांचा सहभाग असणार आहे. शासनाच्या या पुढाकारामुळे इतिहासातील हा तेजस्वी अध्याय केवळ स्मरणापुरता न राहता सम ाजमनात रुजवण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे.

या उपक्रमांतर्गत राज्यभर विविध स्वरूपाचे कार्यक्रम राबविले जात आहेत. गुरु तेग बहादूर साहिब यांच्या स्मृती जपण्यासाठी विशेष टपाल तिकीट आणि विशेष नाणे जारी करण्यात आले असून, यामुळे त्यांचे विचार घराघरात पोहोचतील. त्या काळातील ऐतिहासिक शस्त्रे, दस्तऐवज आणि सांस्कृतिक वारसा मांडणारी प्रदर्शने आयोजित करण्यात येत असून, त्यातून इतिहासाचा जिवंत अनुभव मिळतो आहे. तसेच शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि विविध समाजघटकांच्या माध्यमातून प्रबोधनात्मक कार्यक्रम, चर्चा, संगोष्टी आणि सांस्कृतिक सादरीकरणे राबवली जात आहेत. या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिब यांचे तत्त्वज्ञान केवळ ऐकण्यापुरते न राहता समजून घेण्याची संधी निर्माण होत आहे.

या उपक्रमाची सुरुवात नागपूर येथील भव्य कार्यक्रमाने झाली. ७ डिसेंबर २०२५ रोजी नागपूरमध्ये पार पडलेल्या या राज्यस्तरीय कार्यक्रमाला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची उपस्थिती आणि विविध समाजघटकांचा सक्रिय सहभाग यामुळे हा कार्यक्रम केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक एकात्मतेचे प्रतीक ठरला. शिस्तबद्ध उपस्थिती, श्रद्धेचा भाव आणि इतिहासाबद्दलची जाणीव यामुळे नागपूरचा कार्यक्रम 'हिंद दी चादर' उपक्रमातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला.

यानंतर नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य स्वरूपात कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. शीख धर्माचे दहावे गुरु श्री गुरु गोविंदसिंह यांची कर्मभूमी असलेल्या नांदेडमध्ये होणारा हा कार्यक्रम ऐतिहासिकदृष्ट्या विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. या दोन दिवसांच्या कार्यक्रमात गुरुवाणी, सांस्कृतिक सादरीकरण, विचारमंथन आणि सामाजिक एकात्मतेचे उपक्रम राबवले जाणार आहेत. महाराष्ट्रासह इतर राज्यांतील भाविक, सामाजिक कार्यकर्ते आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होतील, अशी अपेक्षा आहे.

त्यानंतर नवी मुंबई येथे १८ आणि १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई महानगर परिसरातील आणि पश्चिम म हाराष्ट्रातील विविध समाजघटकांना एकत्र आणणारा हा कार्यक्रम गुरु तेग बहादूर साहिब यांच्या विचारांचा व्यापक प्रभाव अधोरेखित करणारा ठरेल. गुरुवाणी, कीर्तन, सामाजिक समरसतेचे उपक्रम, लंगर आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश प्रभावीपणे मांडला जाणार आहे.

या सर्व उपक्रमांचा एकत्रित परिणाम असा होणार आहे की, गुरु तेग बहादूर साहिब यांचा इतिहास पुस्तकांच्या पानांपुरता मर्यादित न राहता सामान्य माणसाच्या जीवनाशी जोडला जाईल. शालेय विद्यार्थ्यांपासून तरुणांपर्यंत, समाजातील विविध घटकांपर्यंत त्यांचे बलिदान, विचार आणि मूल्ये पोहोचतील. महाराष्ट्र शासनाच्या या प्रयत्नांमुळे गुरु तेग बहादूर साहिब हे केवळ शीख समाजाचे गुरु न राहता, संपूर्ण भारतीय समाजासाठी धर्मस्वातंर्त्य, सहिष्णुता आणि मानवतेचे कालातीत प्रतीक म्हणून नव्या पिढीच्या मनात स्थान मिळवतील. हीच त्यांच्या म हान बलिदानाला खरी आदरांजली ठरेल.

## देशभरात वायू प्रदूषणाचा कहर; जाणून घ्या त्यापासून कोणते आजार होतात

दिल्लीतील वायू प्रदूषण दिवसेंदिवस वाढत आहे आणि त्यातून सुटका मिळण्याचे कोणतेही संकेत दिसत नाहीत. कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी ढगांच्या आधारे केलेला प्रयोग अयशस्वी झाल्यानंतर परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. एअर क्वालिटी ट्रॅकर रळिं.ळप नुसार, शुक्रवारी सकाळी ७ वाजता दिल्लीतील हवेचा दर्जा निर्देशांक ४५५ होता, जो खूप जास्त आहे. हे दिवसाला अंदाजे ११ सिगारेट ओढण्यासारखे आहे. या समस्येच्या पार्श्वभूमीवर, सरकारने आरोग्यविषयक गाईडलाईन तयार केली आहे. यात लोकांना अत्यंत आवश्यक नसल्यास बाहेर न जाण्याचा सल्ला देण्यात आला आहे. ज्यांना बाहेर जाणे अनिर्वाय आहे त्यांनी एन-९५ मास्क घालावे. तसंच जॉगिंग, धावणे आणि योगासारखे बाह्य व्यायाम टाळावेत. अशा परिस्थितीत, आज या बातमीतून वायू प्रदूषणाचा आपल्या आरोग्यावर काय परिणाम होतो आणि त्यामुळे कोणते आजार होतात हे जाणून घेऊया.

वायू प्रदूषण म्हणजे काय आणि त्यामुळे आजार कसे होतात? डब्ल्युएचओ वेबसाइटनुसार, वायू प्रदूषण ही स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक समस्या आहे जी वायू, रसायने आणि लहान कण यांसारख्या प्रदूषकांच्या उत्सर्जनामुळे उद्भवते. वायू प्रदूषण म्हणजे हवेत एक किंवा अधिक दूषित घटकांची उपस्थिती, जसे की धूळ, गॅस, वास, धूर किंवा बाष्प, ज्यांचे प्रमाण जास्त असते आणि याच्या दीर्घकाळ संपर्कात राहिल्यास आरोग्यविषयक गंभीर धोका निर्माण होऊ शकते. या प्रदूषमुळे शरीरातील पेशींमध्ये जळजळ, ऑक्सिडेटिव्ह ताण, इम्युनोसप्रेशन आणि म्युटेजेनिसिटी निर्माण होते, ज्यामुळे फुफ्फुसे, हृदय, मेंदू आणि इतर अवयवांवर परिणाम होतो, ज्यामुळे शेवटी गंभीर आजार होतात.

वायू प्रदूषणामुळे कोणते अवयव प्रभावित होतात? शरीरातील जवळजवळ प्रत्येक अवयव वायू प्रदूषणामुळे प्रभावित होऊ शकतात. त्यांच्या लहान आकारामुळे, काही वायू प्रदूषक फुफ्फुसांमधून रक्तप्रवाहात प्रवेश करतात आणि संपूर्ण शरीरात पसरतात, ज्यामुळे प्रणालीगत दाह आणि कर्करोगाचा धोका वाढतो.

वायू प्रदूषणाच्या संपर्कात आल्याने कोणते आजार होतात? डब्ल्युएचओ वेबसाइटनुसार, वायू प्रदूषणामुळे स्ट्रोक, इस्केमिक हृदयरोग, क्रॉनिक ऑब्स्ट्रक्टिव्ह पल्मोनरी डिसीज, फुफ्फुसांचा कर्करोग, न्यूमोनिया आणि मोतीबिंदू यासारख्या अनेक आजारांचा धोका वाढतो. वायू प्रदूषणाच्या संपर्कात आल्याने दमा आणि ण्ध्ङ सारखे श्वसनाचे आजार, हृदयरोग, फुफ्फुसांचा कर्करोग आणि अल्झायमर आणि पार्किन्सन सारखे न्यूरोलॉजिकल आजार होण्याचा धोका देखील वाढतो. यामुळे गर्भधारणेदरम्यान गुंतागुंत आणि जन्मजात दोष, एक्झिमा सारख्या त्वचेच्या समस्या आणि मधुमेह आणि मूत्रपिंडाच्या आजारासारख्या इतर समस्या देखील उद्भवू शकतात.

बालकं, वृद्ध आणि गर्भवती महिलांना वायू प्रदूषणाशी संबंधित आजारांचा धोका जास्त असतो. आनुवंशिकता, सह-रोग, पोषण आणि सामाजिक-लोकसंख्याशास्त्रीय घटक देखील वायू प्रदूषणाप्रती व्यक्तीच्या संवेदनशीलतेवर परिणाम करतात. गर्भधारणेदरम्यान वायू प्रदूषणाच्या संपर्कात आल्याने गर्भाच्या आरोग्यावर परिणाम होतो.

आजार निर्माण करणारे सर्वात धोकादायक वायु प्रदूषक कोणते आहेत? आरोग्यावर प्रतिकूल परिणाम करणारे अनेक विषारी घटक असले तरी, सार्वजनिक आरोग्यासाठी सर्वात जास्त चिंतेचे असलेले प्रदूषक म्हणजे कणयुक्त पदार्थ, कार्बन मोनोऑक्साइड, ओझोन, नायट्रोजन डायऑक्साइड आणि सल्फर डायऑक्साइड . सूक्ष्म कणयुक्त पदार्थ हे आरोग्यासाठी धोक्याचे आहे. कारण हे अतिशय लहान कण फुफ्फुसांमध्ये खोलवर जाऊ शकतात, रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात आणि अवयवांमध्ये देखील प्रवेश करू शकतात, ज्यामुळे ऊती आणि पेशींना प्रणालीगत नुकसान होते.

दररोज हवेची गुणवत्ता ट्रॅक करा
घरात उच्च दर्जाचे एअर प्युरिफायर वापरा
मास्क घाला (पण फक्त कोणताही मास्क नाही)
घरीभोवती झाडे लावा
कमी प्रमाणात बाहेर पडा
स्मार्ट पद्धतीने व्हेंटिलेट करा
सार्वजनिक वाहतूक किंवा कारपूलिंग निवडा
आहाराविषयक काळजी घ्या

वायू प्रदूषण हे एक मोठे आव्हान आहे. पण मास्क घालण्यापासून ते झाडे लावण्यापर्यंतचे प्रत्येक पाऊल स्वच्छ हवा आणि निरोगी जीवनाला हातभार लावते.

## चेहऱ्यावर दररोज लावा जवस बियांचे पाणी, जाणून घ्या योग्य पद्धत आणि फायदे

आयुर्वेदात, आरोग्याच्या समस्या कमी करण्यासाठी जवसाच्या बियांचा वापर अत्यंत फायदेशीर मानला जातो. जवसाच्या बिया अनेक पोषक तत्वांनी समृद्ध असलेले एक सुपरफूड आहेत. जे पचन, हृदयाचे आरोग्य आणि हार्मोनल असंतुलन सुधारण्यासाठी प्रभावी मानले जातात.

पण तुम्हाला माहित आहे का की या बियांचे सेवन करणे केवळ आरोग्यासाठी फायदेशीर नाही तर ते त्वचेसाठीदेखील रामबाण उपाय आहे. जवसाच्या बियांचा वापर केल्याने चेहऱ्याचा रंग सुधारण्यास आणि त्वचेशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत होते. तुमची त्वचा निरोगी ठेवण्यासाठी तुम्ही नियमितपणे जवसाच्या बियांचे पाणी लावू शकता..

**त्वचा हायड्रेट ठेवते-**

चेहऱ्यावर जवसाचे पाणी लावल्याने तुमच्या त्वचेला आतून आणि बाहेरून हायड्रेट राहण्यास मदत होते, ज्यामुळे तिची नैसर्गिक आर्द्रता टिकून राहते. शिवाय, ते मऊ आणि गुळगुळीत त्वचा राखण्यास देखील मदत करते.

**त्वचेचा रंग सुधारतो-**

चेहऱ्यावर जवसाचे पाणी लावल्याने त्वचेचा रंग सुधारतो. ते तुमच्या त्वचेवरील घाण आणि धूळ काढून टाकण्यास मदत करते. डाग आणि टॅनिंग कमी करते.

**त्वचेची चमक वाढवते-**

जवसाचे पाणी त्वचेचा रक्त प्रवाह सुधारते, तिची नैसर्गिक चमक वाढवते. ते त्वचेतील विषारी पदार्थ काढून टाकण्यास आणि तिची नैसर्गिक चमक राखण्यास देखील मदत करते.

**वृद्धत्वाची लक्षणे कमी करते-**

जवसाचे पाणी वापरल्याने अकाली वृद्धत्वाची लक्षणे कमी होण्यास मदत होते. त्यात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि फॅटी ॲसिड त्वचेच्या पेशी दुरुस्त करतात आणि सुरकुत्या आणि बारीक रेषा यांसारख्या वृद्धत्वाच्या लक्षणांपासून आराम मिळतो.

**पिंपल्स कमी करते-**

जवसाच्या बियांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते. जे सेबम उत्पादन नियंत्रित करतात आणि त्वचा खोलवर स्वच्छ करतात. जवस बियांचे पाणी नियमितपणे चेहऱ्यावर लावल्याने त्वचेची जळजळ कमी होते आणि हार्मोनल असंतुलनामुळे होणाऱ्या मुरुमांपासून आराम मिळतो.

जवस बियांचे पाणी चेहऱ्यावर कसे लावावे?

यासाठी एक ग्लास पाण्यात १ चमचा जवसाचे बीज घाला. हे पाणी रात्रभर तसेच ठेवा.

दुसऱ्या दिवशी सकाळी, पाणी गाळून घ्या आणि ते थेट तुमच्या चेहऱ्यावर लावा.

# आतड्याचे आजार व त्याचे प्रकार

आतड्याचे आजार म्हणजे पचनसंस्थेतील समस्या, ज्यात पोटदुखी, सूज, बद्धकोष्ठता किंवा अतिसार, गॅस, आणि शौचातून रक्त येणे यांसारखी लक्षणे दिसतात; क्रोहन रोग, अल्सरेटिव्ह कोलायटीस, आतड्यांमध्ये अडथळे (ेंलीींीलींळेप) आणि कर्करोग यांसारखे गंभीर आजार यात समाविष्ट आहेत, जे खराब आहार, तणाव आणि जंतूंमुळे होऊ शकतात आणि योग्य निदान व उपचारांनी नियंत्रणात आणता येतात.

आतड्यांच्या आजारांची सामान्य लक्षणे:
पोटदुखी आणि पेटके (लीरााि)
ओटीपोटात सूज आणि फुगल्यासारखे वाटणे (लश्रेरींळपस)
बद्धकोष्ठता (लेपीींळरिींळेप) किंवा अतिसार (वळरीहशर)



शौचातून रक्त पडणे (लाल किंवा काळे) अचानक वजन कमी होणे, थकवा, ताप आणि थंडी वाजणे, वारंवार गॅस होणे, आतड्यांच्या आजारांचे प्रकार:इंफ्लेमेटरी बाऊल डिसीज (खइऊ): क्रोहन रोग आणि अल्सरेटिव्ह कोलायटीस यांचा यात समावेश होतो, जे आतड्यांमध्ये दीर्घकाळ सूज आणतात. आतड्यांतील अडथळा आतड्याचा भाग एकमेकांमध्ये सरकणे, गाठ , हर्निया किंवा चिकटणे यामुळे अन्न पुढे सरकणे थांबते.आतड्याचा कर्करोग: अलीकडे याचे प्रमाण वाढत आहे, ज्याचे निदान कोलोनोस्कोपीने होते.
लीकी गट सिंड्रोम: आतड्यांमधून विषारी पदार्थ रक्तात मिसळणे.

# निद्रानाश, डोकेदुखी, मूर्च्छा आदी विकारांवर आयुर्वेदीय उपचार

संकलक : डॉक्टर, तसेच वैद्याचार्य सद्गुरु वसंत बाळाजी आठवले आणि डॉ. कमलेश वसंत आठवले

१. जास्त झोप येण्यावर कोणते उपचार करावेत ?
२. मंदबुद्धीच्या मुलांची काळजी कशी घ्यावी ?
३. काही मुले कारण नसतांना का रडत रहातात ?
४. स्वप्ने का पडतात आणि त्यांचे प्रकार कोणते ?
५. अर्धशिशी (मायग्रेन) होण्याची कारणे कोणती ?

निद्रानाश: ते काय आहे, लक्षणे, कारणे आणि उपचार-निद्रानाश: लक्षणे, चिन्हे, कारणे, प्रतिबंध, घरगुती उपचार आणि उपचार सामग्री सारणी
अनिद्राची लक्षणे कोणती?
निद्रानाशाचे प्रकार काय आहेत?
निद्रानाशाची कारणे काय आहेत?
निद्रानाशाचे निदान कसे केले जाते?
निद्रानाशाचा उपचार कसा केला जातो?
तणावामुळे निद्रानाश होऊ शकतो का?
निद्रानाश कसा टाळायचा?
निद्रानाशासाठी घरगुती उपाय
निद्रानाश च्या जोखीम घटक
निद्रानाश च्या गुंतागुंत
निद्रानाशासाठी डॉक्टरांना कधी भेटायचे?
वारंवार विचारले जाणारे प्रश्न

शांत झोप आमच्यासाठी महत्त्वाची आहे एकूण आरोग्य आणि फिटनेस. असे मानले जाते की एखाद्या व्यक्तीसाठी नियमितपणे व्यायाम करणे किंवा निरोगी आहार राखणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे, दिवसभर तुम्हाला उत्साही ठेवण्यासाठी दर्जेदार झोप आवश्यक आहे. जर तुम्हाला सतत झोप येण्याचा किंवा झोप न लागण्याचा त्रास होत असेल तर तुम्हाला निद्रानाश नावाचा झोप विकार आहे. एखादी



व्यक्ती जी अनेक तासांच्या झोपेनंतर उठू शकते तरीही थकवा जाणवत असेल, थकवा जाणवत असेल किंवा दिवसभरात काम करणे किंवा लक्ष केंद्रित करणे कठीण होत असेल, तर त्याला/तिला निद्रानाश होतो, ज्याचा आपल्या मानसिक आणि शारीरिक स्थितीवरही परिणाम होतो.
अनिद्राची लक्षणे कोणती?
खालील आहेत निद्रानाशाची चिन्हे/लक्षणे:
रात्री झोप लागण्यास त्रास होतो
रात्री खूप वेळा जागे होणे
रात्री उठल्यानंतर झोप परत येण्यात अडचण
सकाळी खूप लवकर उठणे
रात्रीच्या झोपेनंतर ताजेतवाने वाटणे किंवा नीट विश्रांती न घेणे
दिवसा थकवा किंवा कमी ऊर्जा
एकाग्र करणे, लक्ष केंद्रित करणे किंवा गोष्टी लक्षात ठेवण्यात अडचण
चिडचिड, चिंता किंवा नैराश्य
एकाग्रतेच्या अभावामुळे किंवा झोप न लागल्यामुळे वाढलेल्या चुका किंवा अपघात
तणाव डोकेदुखी
झोपेच्या विस्कळीत नमुन्यांमुळे अपचन किंवा पोटात अस्वस्थता यासारखी गॅस्ट्रोइंटेस्टाइनल लक्षणे
झोपेबद्दल सतत चिंता किंवा चिंता
वरील सर्व लक्षणे तुम्हाला चिडचिड करतात; तुम्हाला सतत थकवा आणि मूड स्विंग जाणवू शकतो. लक्ष केंद्रित करणे आणि गोष्टी लक्षात ठेवणे कठीण होते.
निद्रानाशाचे प्रकार काय आहेत?
कालावधीवर आधारित निद्रानाशाच्या विविध प्रकारांमध्ये हे समाविष्ट आहे:
क्षणिक निद्रानाश - एक महिन्यापेक्षा कमी काळ टिकतो
तीव्र किंवा अल्पकालीन निद्रानाश - एक ते सहा महिने टिकते
तीव्र निद्रानाश - सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ टिकतो निद्रानाशाची कारणे काय आहेत?
निद्रानाशाची कारणे त्याच्या प्रकारानुसार बदल-तात. गंभीर निद्रानाशाच्या कारणांमध्ये तणाव, औषधांचे दुष्परिणाम, तुम्ही सहसा झोपता त्या जागेत किंवा स्थानातील बदल, आज-ारपण, जेट लॅग, तुमच्या शरीरात वेदना किंवा अलीकडच्या काळात घडलेल्या काही त्रासदायक किंवा अस्वस्थ करणाऱ्या घटनांचा समावेश असू शकतो. किंवा आधी.
तीव्र निद्रानाश सामान्यतः झोपेच्या विकारांमुळे, कर्करोग, मधुमेह, ऍसिड रिफ्लक्स (ज्याला जीईआरडी म्हणून ओळखले जाते) पाठदुखी, संधिवात, चिंता, नैराश्य इत्यादींमुळे उद्भवते. निद्रानाशाची विविध कारणे असू शकतात आणि ती अनेकदा घटकांच्या संयोगातून उद्भवते. निद्रानाशाची काही सामान्य कारणे आहेत:
ताण आणि चिंता: मानसिक आरोग्य स्थिती जसे की तणाव, चिंता, नैराश्य किंवा जीवनातील महत्त्वाच्या घटनांमुळे झोप लागणे किंवा झोप लागणे कठीण होऊ शकते.
झोपेच्या खराब सवयी: झोपेचे अनियमित वेळापत्रक, उशीरा झोपणे, झोपण्याच्या वेळेची विसंगत दिनचर्या, दिवसा जास्त डुलकी घेणे किंवा झोपायच्या आधी उत्तेजक क्रियाकलापांमध्ये गुंतणे यामुळे शरीराच्या नैसर्गिक झोपेचे चक्र विस्कळीत होऊ शकते.
वैद्यकीय अटी: काही वैद्यकीय परिस्थिती, जसे की तीव्र वेदना, दमा, संधिवात, ऍलर्जी, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल समस्या, न्यूरोलॉजिकल विकार आणि हार्मोनल असंतुलन (उदा. थायरॉईड समस्या), झोपेमध्ये व्यत्यय आणू शकतात.
औषधे: ऍलर्जी, दमा, उच्च रक्तदाब, नैराश्य, आणि -उळऊ सारख्या परिस्थितींसाठी काही प्रिस्क्रिप्शन औषधे दुष्परिणाम म्हणून झोपेच्या पद्धतींमध्ये **(क्रमशः पुढील उद्याच्या अंकात)**

# अस्वस्थ इराण देशाही आंदोलनाचा भडका

**जर्मनी, ब्रिटन, फ्रान्स यांच्याकडून निदर्शकांवरील हल्ल्याचा निषेध झाला. भयमुक्त वाता-वरणात नागरिकांना आपले मत व्यक्त करण्याचा अधिकार आहे, असे हे देश म्हणतात. ग्रीनलँडचा घास घ्यायला निघालेल्या अमेरिकेविरोधात हे देश डेन्मार्कच्या पाठीशी राहतील, अशी अपेक्षा!**

इराणमध्ये सरकारच्या विरोधात आंदोलनाचा भडका उडाला आहे. आंदोलकांबरोबर संवादाऐवजी त्यांना चिरडण्यास सुरुवात झाली. खामेनी यांची राजवट कायम राहणार? की, तेथे सत्ता परिवर्तन होणार, याकडे सार्या जगाचे लक्ष आहे. रियाल हे इराणचे चलन. रियालचे प्रचंड वेगाने अवमूल्यन झाल्याने नागरिकांना जीवघेण्या स्थितीचा सामना करावा लागत आहे. १ लाख ४० हजार रियाल म्हणजे एक डॉलर, या भयचकित करणार्या समीकरणामुळे नागरिकांच्या बचतीचे मूल्य शून्य झाले! अन्नधान्य, औषधे, इंधन यांची खरेदी नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेली. यातूनच डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात तेहरानमधील ग्रँड बाजारात असंतोषाचा स्फोट झाला आणि पाहता पाहता इराणच्या सर्व ३१ प्रांतांमध्ये आंदोलनाचे लोण पसरले. या आंदोलनामागे अमेरिका आणि इस्रायल आहे, असा दावा रशियाने केला. त्यात तथ्य असले तरी खामेनी यांच्या सरकारने परकीय





शक्तींना हस्तक्षेपाची संधी आपल्याच कारभारामुळे दिली, हे नाकारता येणार नाही. दहशतवादी संघटनांना आशीर्वाद आणि संरक्षण, हे बहुसंख्य इस्लामी देशांचे धोरण. पाकिस्तानसाठी अशा संघटना भारताविरुद्धचे अस्त्र ठरतात, तर इराण अथवा अन्य देशांसाठी इस्रायलसाठी त्यांचा वापर होतो; मात्र यातून निर्माण होणार्या संघर्षात नागरिकांची दैना उडते, याचे भान इराणसह अनेक देशांना नाही. हिजबुलला आणि हमास या संघटनांना इराणचे संरक्षण आहे. त्यामुळे इस्रायल इराणसंदर्भात कायम आक्रमक भूमिकेत राहिला आहे. यातूनच इस्रायलने गेल्या वर्षी इराणच्या अणुकेंद्रावर हल्ले केले. इराणचे लष्कर प्रमुख तेव्हाच्या संघर्षात मारले गेले.

इथेही अमेरिका
इथेही अमेरिकेचे दुटप्पी धोरण पाहण्यासारखे आहे. आपल्या इशार्यावर नाचणार्या पाकिस्तानला अण्वस्त्र सज्ज करण्यात पुढाकार आणि रशियाशी जवळीक ठेवणार्या इराणच्या बाबतीत ओरड, ही अमेरिकेची नीती. आताही आंदोलन दडपून टाकण्यासाठी इराण सरकारने इंटरनेट बंद केल्यावर अमेरिकेने उपग्रहाद्वारे इंटरनेट सेवा पुरवण्यासाठी तंत्रज्ञान कंपन्यांना खास सवलती दिल्या आहेत. आंदोलकांची संपर्क यंत्रणा जपण्यासाठी अमेरिकेची सुरू अस-लेली लगबग सूचक आहे. अमेरिका इराणमधील आंदोलकांच्या लोकशाही आणि मानवाधिकार मागण्यांचे जाहीर समर्थन करते, असे डोनाल्ड ट्रम्प म्हणतात. व्हेनेझुएलाने मात्र आमच्या आदेशावर चालावे, ग्रीन लँडमध्ये तर लोकसंख्याच कमी असल्याने मानवाधिकाराचा प्रश्न नाही, हे त्यांचे म्हणणे असावे! विजनव-ासात असलेले इराणचे युवराज रझा पह-लवी आंदोलन यशस्वी झाल्यास इराणमध्ये परतू शकतात. खामेनींविरुद्ध आंदोलनाला त्यांचा खुला पाठिंबा आहे.

निदर्शने रोखण्यात अपयश आल्यास खामेनी रशियात आश्रय घेतील, अशा चर्चांना सुरुवात झाली आहे. रशिया आणि इराणमध्ये लष्करी आणि धोरणात्मक भागीदारी आहे. रशिया कोणती पावले उचलणार, हेही इराणची पुढील दिशा ठरण्यात महत्त्वाचे ठरणार आहे. युक्रेन युद्ध अद्याप अनिर्णित असल्याने रशिया उघडपणे काही करेल, अशी शक्यता कमी दिसते. इराणमधील आंदोलकांकडून प्रार्थनास्थळे आणि मौलवींना लक्ष्य करण्यात आले. मध्यंतरी हिजाब सक्तीवरून इराण सरकारला महिलांच्या असंतोषाचा सामना करावा लागला होता. इराणमधील सुधारणावादी गट, अर्थ, उद्योग आणि व्यापार याच्याशी संबंधित 'बझार' हा महत्त्वाचा घटक आणि महागाईच्या आगीत होरपळणारे सर्वसामान्य नागरिक खामेनींविरुद्ध एकवटले आहेत. म्हणूनच आताच्या आंदोलनाची व्याप्ती मोठी ठरली आणि खामेनींच्या राजवटीला कधी नव्हे, एवढे कडवे आव्हान मिळाले. आंदोलनात भाग घेणार्या प्रत्येकाला ईश्वराचे शत्रू मानून मृत्युदंड दिला जाईल, असे धमकावण्यात आले, तरीही आंदोलकांकडून माघार घेतली जाण्याची कोणतीही चिन्हे नाहीत. आंदोलनात पाचशेहून अधिक बळी गेले आहेत. मूलतत्त्ववादी राजवट जाऊन नागरिकांना मोकळा श्वास घेता यावा, याला विरोध असण्याचे कारण नाही; पण अमेरिकेची हस्तक सत्ता तेथे आल्यास इराणमधील अस्वस्थतेचे पर्व संपण्याची शक्यता नाही.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

नोकरी करणा-या महीलांना आठ ते दहा तास घराबाहेर रहावे लागते अशा महीलांनी स्तनपान कसे करावे?काही कामाच्या ठिकाणी सामाजिक बांधिलकीतून व ऑफिसमधील सहका-यांचे पूरेसे सहकार्य मिळाल्यामुळे व्यवस्थित नियोजन करुन महीला काम करताना देखील बाळाला स्तनपान करतात.स्तनपाना मुळे तुमच्या बाळासोबत तुमचे एक अतूट नाते तयार होते त्यामुळे तुमचे बाळ तुम्ही घरी येण्याची वाट पाहत असते.जर कामाच्या ठिकाणी बाळ नेणे शक्य नसेल तर तुम्ही घरी नसताना तुमचे दूध बाळाला मिळावे यासाठी ते कसे साठवून ठेवावे याबाबतीत तज्ञांचे मार्गदर्शन घ्या. जाणून घ्या बाळाच्या रडण्यामधून त्यांच्या मनातील भावना कशा




## २ Joke — विनोद





ाजूला ठेवून वजन केले - ४८ किलो.
मुलीने चप्पल काढून वजन केले - ४७ किलो
मुलगी ओढणी काढणारच होती तेवढ्यात पैसे संपतात.
ती मशीनवरून उतरू लागते, तेवढ्यात एक मुलगा म्हणतो...तू वजन करत राहा, पैसे मी टाकत राहतो.

## ३ Message — संदेश



Santa: Pados me kya chal raha hai?
Banta: Birthday hai
Santa: Kiska?
Banta: Tuyu ka
Santa ne puchha: Tuyu!! ???
Banta: Haan, sunai to kuchh

## ४ Thought — सुविचार




अपयश हेच दर्शविते की आणखी साधनेची आवश्यकता आहे. - राहूल सांकृत्यायन

**संस्कृत सुभाषित**

विद्या नसे ज्या तप दान नाही ।
न ज्या गुण ज्ञान न शील काही ।। न धर्म भूमिप्रति भारकारी । पशूच ते मानव देहधारी ।।

**अर्थ :** त्याग, श्रीगुरुंची कृपा, सत्यवाणी, शौर्य, अंत:करणाची निश्चलता व निरोगी-पणा अशा गुणांची येथे प्रशंसा केली आहे.

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तर

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तर

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालह-वाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा




# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### आयपीएल २०२६ साठी आरसीबी ला मिळाले २ नवीन होमग्राउंड, मुंबईतील 'या' स्टेडियममध्ये होणार सामने

मुंबई-इंडियन प्रीमियर लीगच्या १९ व्या सीजनला येत्या काही महिन्यात सुरुवात होणार आहे. मागच्या वर्षी आयपीएलचे विजेतेपद रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने जिंकले होते. मात्र त्यानंतर बंगळुरूच्या चिन्नस्वामी स्टेडियमवर आरसीबीचा विजयोत्सव साजरा होत असताना स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंरीत जवळपास ११ खेळाडूंचा मृत्यू झाला. त्यानंतर चिन्नस्वामी स्टेडियमला कोणतेही क्रिकेट सामने खेळवण्यासाठी अनफिट म्हणून घोषित करण्यात आले. चिन्नस्वामी स्टेडियम हे आयपीएलमध्ये आरसीबीचे होम ग्राउंड होते, मात्र आयपीएल २०२६ साठी आरसीबी त्यांच्या नवीन होमग्राउंडच्या शोधात होती. रिपोर्ट्समधून समोर आलेल्या माहितीनुसार येत्या आयपीएल सीजनमध्ये आरसीबी २ नवीन होमग्राउंड मिळाले आहेत.

### 'भारतीय क्रिकेटची पंढरी' मुंबईचा पराभव; दोन संघ सेमीफायनलमध्ये

बेंगळुरु-भारताची सर्वात जुनी घरगुती स्पर्धा, विजय हजारे ट्रॉफी, आता संपण्याच्या जवळ आली आहे. आठ संघांनी क्वार्टर फायनलमध्ये आपलं स्थान निश्चित केलं आहे आणि आता दोन संघांनी सेमीफायनलमध्येही स्थान निश्चित केलं आहे. उर्वरित दोन संघांचा निर्णय मंगळवारी १३ जानेवारी रोजी होईल. मात्र, सोमवारी झालेल्या दोन्ही सामन्यांचा निकाल पावसाच्या व्यत्ययामुळं व्हीजेडी पद्धतीनं लावण्यात आला.

मुंबई विरुद्ध कर्नाटक सामना : सोमवारी विजय हजारे ट्रॉफीमध्ये दोन सामने खेळले गेले. पहिल्या सामन्यात मुंबई आणि कर्नाटक आमनेसामने आले. दुसऱ्या सामन्यात उत्तर प्रदेश सौराष्ट्राशी भिडला. कर्नाटकविरुद्ध प्रथम फलंदाजी करताना, मुंबईनं निर्धारित ५० षटकांत ८ बाद २५४ धावा केल्या, ज्यामध्ये शम्स मुलानीच्या ९१ चेंडूत ८६ धावांचा समावेश होता. कर्नाटक फलंदाजीसाठी आला तेव्हा फक्त ३३ षटकांचा खेळ झाला. तोपर्यंत कर्नाटकनं १ बाद १८७ धावा केल्या होत्या. देवदत्त पडिकल ९५ चेंडूत ८१ धावा करुन नाबाद राहिला.

### 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयांवर समित्या स्थापन करण्याचे निर्देश दिले

नवी दिल्ली-केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाने सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय क्रीडा संघटनांना त्यांच्या संबंधित संस्थांमध्ये 'क्रीडाक्षेत्रात मेक इन इंडिया' आणि 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयांवर समर्पित समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडाक्षेत्रात भारताचा सहभाग अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने आंतरराष्ट्रीय संबंध विषयक समिती सर्व संबंधित आंतरराष्ट्रीय महासंघांमधील आणि वैधानिक मंडळांमधील घडामोडींवर देखरेख ठेवेल, ज्याममध्ये नियम आणि रचनात्मक बदल, प्रशासकीय आराखडा, निवडणुका आणि खेळाडूंवर लक्ष केंद्रित करणाऱ्या उपक्रमांचा समावेश असेल. याशिवाय ही समिती एका मध्यम अवधीच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य धोरणाची आखणी करेल ज्यामध्ये द्विपक्षीय आणि बहुपक्षीय सामंजस्य करार, संयुक्त प्रशिक्षण सराव, देवाणघेवाण उपक्रम, ज्ञान-वाटपाचे उपक्रम आणि भारतात आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याच्या संधी यांचा समावेश असेल.

### ७ ओव्हरमध्येच धुव्वा उडवला, विदर्भची सेमी फायनलमध्ये धडक

नागपूर-विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत विदर्भाने ७६ धावांनी दिल्लीचा पराभव करत सेमी फायनलमध्ये धडक मारली आहे. विदर्भाच्या या विजयात नागपूरच्या पठ्ठ्याने मोलाची भूमिका बजावली आहे. कारण या खेळाडूने एकट्या दिल्लीचे चार खेळाडू तंबूत पाठवले होते.त्यामुळे विदर्भासाठी हा विजय सोप्पा झाला आणि त्यांनी सेमी फायनलमध्ये प्रवेश केला होता.

खरं तर विजय हजारे ट्रॉफीच्या चौथ्या क्वार्टर फायनल सामन्यात विदर्भ आणि दिल्लीची टीम आमने सामने आली होती. या सामन्यात विदर्भने दिल्लीसमोर ३०० धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सूरूवात खराब झाली होती. कारण दिल्लीचे दोन्हीही सलामीवीर वैभव कांडपाल आणि प्रियांश आर्या २८ धावांवर बाद झाले होते. त्यानंतर नितीश राणा शुन्यावर बाद झाला.

## हरमनप्रीतने घडवला इतिहास! महिला प्रीमियर लीग स्पर्धेत खेळताना १००० धावा पूर्ण

# असा रेकॉर्ड करणारी ठरली पहिलीच भारतीय फलंदाज

**नवी दिल्ली:** मुंबई इंडियन्सची कर्णधार हरमनप्रीत कौरने महिला प्रीमियर लीग स्पर्धेत मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे.

करीरपीशिशीं घरी ठशलेंव: भारतीय महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने महिला प्रीमियर लीग स्पर्धेत खेळताना मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. हरमनप्रीत कौर सध्या महिला प्रीमियर लीग स्पर्धेत मुंबई इंडियन्सचं नेतृत्व करत आहे. गुजरात जायंट्स संघाविरूद्ध खेळताना मुंबई इंडियन्सने विक्रमी १९३ धावांचा यशस्वी पाठलाग केला. या धावांचा पाठलाग करताना हरमनप्रीत कौरने नाबाद ७१ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर तिने एख मोठा विक्रम आपल्या नावावर केला आहे. हरमनने महिला प्रीमियर लीग स्पर्धेत खेळताना १००० धावा पूर्ण केल्या आहेत. तिच्या या कामगिरीमुळे मुंबई इंडियन्सच्या विजयाचा आनंद द्विगुणित झाला आहे.

हरमनप्रीतने या स्पर्धेतील पहिल्या हंगामापासूनच मुंबईच्या फलंदाजीची एक बाजू धरून ठेवली आहे.तिच्या फलंदाजीचं वैशिष्ट्य म्हणजे, कितीही दबाव असला तरीदेखील ती सयंम ठेवून फलंदाजी करते आणि योग्यवेळी योग्य फटका मारते. त्यामुळेच ती हा मोठा विक्रम आपल्या नावावर करू शकली आहे. असा कारनामा इतर कुठल्याही भारतीय महिला फलंदाजाला करता आलेला नाही.

महिला प्रीमियर लीग स्पर्धेत सर्वाधिक धावा करण्याच्या यादीत ती दुसऱ्या स्थानी पोहोचली आहे. तिच्या नावे १०१६ धावा करण्याची नोंद आहे. या यादीत अव्वल स्थानी असलेल्या नेट सिव्हर ब्रंटने ११०१ धावा केल्या आहेत. तर तिसऱ्या स्थानी असलेल्या मेग लेनिंगने ९९६ धावा केल्या आहेत. मेग लेनिंगकडेही १००० धावांचा पल्ला गाठण्याची संधी आहे. एलिस पेरीने ९७२ धावा केल्या आहेत. तिने या हंगामापूर्वी माघार घेण्याचा निर्णय घेतला होता. तर शफाली वर्माच्या नावे ८८७ धावा करण्याची नोंद आहे.



### अशी कामगिरी करणारी ठरली पहिलीच महिला

या सामन्यात पहिल्या फलंदाजीसाठी आलेल्या गुजरात जायंट्सने १९२ धावा केल्या होत्या. मुंबई इंडियन्सला हा सामना जिंकण्यासाठी १९३ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना हरमनने आक्रमक सुरूवात केली आणि शेवटपर्यंत उभी राहिली. या सामन्यात फलंदाजीला येण्यापूर्वी तिला हा विक्रम आपल्या नावावर करण्यासाठी अवघ्या काहीच धावांची गरज होती. तिने फलंदाजीला येताच चौकार षटकारांचा पाऊस पाडला आणि हा मैलाचा दगड गाठला. असा विक्रम करणारी ती पहिलीच भारतीय महिला फलंदाज ठरली आहे. याआधी सर्वाधिक धावा करण्याचा विक्रमही तिच्याच नावे होता.

## पाकिस्तानात जन्मलेल्या आणि अमेरिकेकडून खेळणाऱ्या अली खानला भारताने टी२० वर्ल्डकपसाठी व्हिसा नाकारला?

**नवी दिल्ली:**भारतात होणाऱ्या टी२० वर्ल्डकपच्या पार्श्वभूमीवर राजकीय आणि सामाजिक वातावरण तापलं आहे. पाकिस्तानात जन्मलेल्या परंतु अमेरिकेकडून खेळणाऱ्या अली खानला भारताने व्हिसा नाकारल्याचं वृत्त आहे. अली खानने इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे ही गोष्ट शेअर केली आहे. अमेरिकेचा पहिला सामना ७ फब्रुवारी रोजी भारताविरुद्ध मुंबईत होणार आहे. याच लढतीने टी२० वर्ल्डकपची सुरुवात होणार आहे. दरम्यान केंद्र सरकार, बीसीसीआय तसंच अमेरिकेच्या क्रिकेट बोर्डाने अधिकृत माहिती दिलेली नाही.

अमेरिकेचा संघ तयारीच्या दृष्टीने आयोजित शिबिरासाठी श्रीलंकेत आहे. अली या संघाचा भाग आहे. अमेरिकेने टी२० वर्ल्डकपसाठी संघाची घोषणा केलेली नाही. मात्र श्रीलंकेतील शिबिरात सहभागी झालेल्या १८ खेळाडूंमधूनच खेळाडूंची घोषणा होणं अपेक्षित आहे. क्रिकइन्फो वेबसाईटने यासंदर्भात वृत्त दिलं आहे. युएसए क्रिकेटवर बंदी आल्यानंतर आयसीसीने प्रशासन आणि लॉजिस्टिक्स यांची जबाबदारी स्वीकारली आहे. अली जगभरात टी२० लीगमध्ये नियमितपणे खेळतो. आयपीएल स्पर्धेतल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाकडून तो खेळला आहे. कोलकाता संघाची मालकी असलेल्या अबू धाबी नाईट रायडर्स, त्रिनबागो नाईट रायडर्स तसंच लॉस एंजेलिस नाईट रायडर्स संघाचं प्रतिनिधित्व करतो. १८व्या वर्षापर्यंत पाकिस्तानात लहानाचा मोठा झालेला अली अमेरिकेतल्या ओहिओ प्रदेशात राहतो ३५वर्षीय अली हा अमेरिकेच्या संघातील पाकिस्तानी वंशाच्या तीन खेळाडूंपैकी एक आहे. एहसान अदील आणि मोहम्मद मोहसीन हे दोन अन्य पाकिस्तानी वंशाचे खेळाडू आहेत. याप्रश्नी तोडगा काढण्यादृष्टीने आयसीसी प्रयत्नशील आहे.

अमेरिकेप्रमाणे टी२० वर्ल्डकपमध्ये सहभागी होणाऱ्या ओमान, युएई आणि इटली संघात पाकिस्तानी वंशाचे खेळाडू आहेत. त्यांना स्पर्धेत खेळण्यासाठी व्हिसा मिळतो का पाहणं उत्सुकतेचं आहे.

भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या वर्ल्डकपमध्ये सहभागी होण्यासाठी व्हिसा मिळवणं ही संबंधित बोर्डाची जबाबदारी असेल. आवश्यकता असल्यास आयसीसीतर्फे कागदपत्रांसाठी मदत पुरवली जाईल. युएसए क्रिकेटवर बंदी असल्याने या संघाची जबाबदारी आयसीसीकडेच आहे.

याआधीही पाकिस्तानी वंशाच्या अन्य संघातील खेळाडूंना भारताचा व्हिसा मिळवण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. इंग्लंड संघातील रेहान अहमद आणि शोएब बशीर यांना व्हिसा मिळवण्यासाठी बराच पाठपुरावा करावा लागला होता. अमेरिकेच्या संघाला २०२४ वर्ल्डकप स्पर्धेत सुपर एट प्रवेशासह २०२६ टी२० वर्ल्डकपसाठी थेट प्रवेश मिळाला. अमेरिकेच्या संघाचा सलामीचा सामना ७ फेब्रुवारीला भारताशी होत आहे. पुढचा सामना पाकिस्तानविरुद्ध १० फेब्रुवारीला कोलंबोत होणार आहे. नेदरलँड्सविरुद्ध १३ तर नामिबियाविरुद्ध १५ तारखेला मुकाबला




**टी२० वर्ल्डकपच्या अनुषंगाने विविध वादांना तोंड फुटलं आहे.**

## दुखापतीतून परतणे केवळ शारीरिक नव्हे, तर मानसिक लढाई : सिंधू

नवी दिल्ली : पायाच्या दुखापतीमुळे स्पर्धांपासून दूर राहण्याचा काळ हा केवळ शारीरिक पुनप्राप्तीपुरता मर्यादित नव्हता, तर मानसिक आव्हाने आणि आत्म-शंका यांवर मात करण्याचाही तो काळ होता, असा आत्मविश्वास दोन वेळा ऑलिंपिक पदकविजेती पी. व्ही. सिंधू हिने व्यक्त केला आहे. ऑक्टोबरनंतर बीडब्ल्यूएफ स्पर्धांमधून माघार घ्यावी लागलेल्या सिंधूने म्हटले की, या विश्रांतीमुळे तिला मानसिकदृष्ट्या स्वतःला सावरण्याची संधी मिळाली. दुखापतीनंतर आपण पुन्हा १०० टक्के तंदुरुस्त होऊ शकतो का, असे अनेक प्रश्न मनात येतात आणि त्यांची उत्तरे स्वतःलाच शोधावी लागतात, असे ती योनेक्स सनराइज इंडिया ओपन सुपर ७५० स्पर्धेपूर्वी म्हणाली. दुखापतीनंतर सिंधूने स्ट्रेंथ आणि कंडिशनिंग कोच वेन लोम्बार्डसोबत पुन्हा प्रशिक्षण सुरू केले आणि अमेरिकेत पुनर्वसन केले. डिसेंबरच्या मध्यात तिने पूर्ण सराव सुरू केला. मलेशिया ओपन सुपर १०० मध्ये पुनरागमन करत तिने उपांत्य फेरी गाठली.



## चहल - धनश्री वर्मा घटस्फोटानंतर एकत्र येणार? त्याने स्वत: सांगितले सत्य

**मुंबई-**भारताचा स्टार गोलंदाज युजवेंद्र चहल आणि त्याची पूर्व पत्नी कोरिओग्राफर धनश्री वर्मा हे दोघे सध्या चर्चेत आले आहेत. मागच्या काही दिवसांपासून घटस्फोटानंतर दोघे 'द ५०' या रिऍलिटी शोमध्ये एकत्र दिसणार अशी चर्चा होती. युजवेंद्र चहलने धनश्री वर्मासोबत २०२० मध्ये लग्न केलं होतं, मात्र चार वर्षांनी दोघांनी घटस्फोट घेतला. २०२५ मध्ये ते दोघे वेगळे झाले. घटस्फोटाच्या ११ महिन्यांनी दोघे रिऍलिटी शोमध्ये एकत्र येणार अशी चर्चा असताना युजवेंद्र चहलने सोशल मीडियावर एक पोस्ट करून माहिती दिली आहे.

'द ५०' हा शो फेब्रुवारी महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यात स्पर्धक म्हणून कोणते कलाकार सहभागी होणार यासाठी फॅन्स उत्सुक असून यासंदर्भात अनेक कलाकारांची नाव चर्चेत आहेत. यात भारताचा क्रिकेटर युजवेंद्र चहल आणि त्याची पूर्व पत्नी धनश्री वर्मा या दोघांचं नाव चर्चेत होतं.

**काय म्हणाला युजवेंद्र चहल?**

क्रिकेटर युजवेंद्र चहलने इंस्टाग्राम स्टोरी पोस्ट करून लिहिले की मागच्या काही दिवसांपासून मी एका रिऍलिटी शोमध्ये भाग घेणार आहे अशी चर्चा आहे. मात्र ही गोष्ट एक अफवा आणि चुकीची असून तसं काहीही नाही. त्यांनी स्पष्ट केले की त्यांचा या शोशी कोणताही संबंध नाही आणि अशा कोणत्याही चर्चा झालेल्या नाहीत. त्यांनी मीडिया आणि सोशल मीडिया वापरकर्त्यांना खोट्या बातम्या पसरवण्यापासून दूर राहण्याचे आवाहन केले आहे.युजवेंद्र चहलच्या टीमने सांगितलं की, 'युजवेंद्र चहल एका रिऍलिटी शोमध्ये सहभागी होत असल्याच्या व्हायरल बातम्यांमध्ये काहीही तथ्य नाही. हे दावे केवळ अनुमानांवर आधारित आहेत आणि पूर्णपणे खोटे आहेत. अलिकडच्या अहवालांमध्ये दावा केल्याप्रमाणे, युजवेंद्र कोणत्याही कार्यक्रमात जाणार नाही आणि त्याने याबद्दल कोणाशीही चर्चा केलेली नाही. आम्ही मीडिया प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडिया वापरकर्त्यांना अशी माहिती टाळण्याची आणि ती पसरवू नये अशी विनंती करतो'.युजवेंद्र आणि धनश्रीच्या घटस्फोटाचे कारण काय होते?

धनश्री वर्मा ही घटस्फोटानंतर एका रिॲलिटी शो मध्ये गेली होती. यात तिने एका स्पर्धकाशी बोलताना सांगितले होते की, लग्नाच्या काही महिन्यांनी तिने युजवेंद्रला तिच्या सोबत चिट करताना पकडले होते. तर काही मीडिया रिपोर्ट्समध्ये असे देखील सांगण्यात आले की धनश्रीला मुंबईला राहायची इच्छा होती, आणि तिला असे वाटत होते की चहलने त्याच्या हरियाणातील कुटुंबाला सोडून तिच्या सोबत मुंबईत शिफ्ट व्हावे. या दोघांवरून दोघांचे भांडण झाले आणि मग ते प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहाचले. आरजे महवशशी जोडले जातेय चहलचे नाव?धनश्री वर्मा सोबत विभक्त झाल्यावर क्रिकेटर युजवेंद्र चहल हा आरजे महवश हिला डेट करतोय अशी चर्चा आहे. अनेकदा दोघांना एकत्र पाहण्यात आलेय. आरजे महवश ही स्टेडियममध्ये चहलला सामन्यादरम्यान चिअर करताना दिसली.



**प्रथम मैत्री नंतर प्रेमात रूपांतर**

## शिखर धवनच्या आयुष्यात नवी इनिंग!

# सोफी शाइनसोबत उरकला साखरपुडा

मुंबई : भारतीय क्रिकेट संघाचा माजी सलामीवीर शिखर धवनने आपल्या वैयक्तिक आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा गाठत दीर्घकाळापासूनची मैत्रिण सोफी शाइनसोबत साखरपुडा केला आहे. सोमवारी (१२ जानेवारी) धवनने अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर खास पोस्ट शेअर करत ही आनंदाची बातमी चाहत्यांना दिली.इंस्टाग्रामवर शेअर केलेल्या पोस्टमध्ये धवनने आयुष्यभर एकत्र राहण्याच्या निर्णयाबद्दल भावना व्यक्त केल्या आहेत. एकत्र हसणं, एकत्र स्वप्न पाहणं आणि एकमेकांचा हात धरून पुढे जाणं या सगळ्या प्रवासासाठी मिळालेल्या प्रेम आणि शुभेच्छांबद्दल मनापासून आभारी आहे, असे भावनिक शब्द त्याने पोस्टमध्ये नमूद केले आहेत.

**दुबईत सुरू झालेली ओळख, प्रेमात रूपांतर:**शिखर धवन आणि सोफी शाइन यांची ओळख काही वर्षांपूर्वी दुबईमध्ये झाली होती. सुरुवातीला मैत्रीच्या नात्याने सुरू झालेला हा प्रवास कालांतराने प्रेमात बदलला. मे २०२५ मध्ये दोघांनी आपले नाते अधिकृतपणे सार्वजनिक केले होते. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी दरम्यान दोघे एकत्र दिसल्यानंतर त्यांच्या नात्याची चर्चा रंगली होती.



**शिक्षण, करिअर आणि सामाजिक कार्यात सक्रिय सोफी**

आयरलंडची नागरिक असलेली सोफी शाइन ही उच्चशिक्षित असून तिने लिमरिक इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथून मार्केटिंग आणि मॅनेजमेंटचे शिक्षण घेतले आहे. सध्या ती अबूधाबी येथे एका आंतरराष्ट्रीय संस्थेत वरिष्ठ पदावर कार्यरत आहे. व्यावसायिक आयुष्यासोबतच ती सामाजिक उपक्रमांमध्येही सक्रिय असून शिखर धवन फाउंडेशनच्या कार्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या फाउंडेशनच्या माध्यमातून क्रीडा आणि समाजसेवेसंबंधी विविध उपक्रम राबवले जातात.

**दुसरं लग्न**-या साखरपुड्यानंतर शिखर धवन लवकरच विवाहबंधनात अडकणार असल्याचे संकेत मिळत आहेत. हा त्याचा दुसरा विवाह असणार आहे. यापूर्वी त्याचा विवाह आयेशा मुखर्जी यांच्याशी झाला होता. २०२३ मध्ये दोघांचा कायदेशीर घटस्फोट झाला. धवनला त्या विवाहातून झोरावर नावाचा

## पाकिस्तान नव्हे हे ४ संघ टी-२० विश्वचषक २०२६ च्या स्पर्धेत सेमीफायनलमध्ये पोहोचणार

**दिल्ली-**आयसीसी टी-२० विश्वचषक ७ फब्रुवारी २०२६ पासून खेळवला जाणार आहे. भारत आणि श्रीलंका या टी-२० विश्वचषकाचं आयोजन करणार आहे. टी-२० विश्वचषकाची स्पर्धा सुरु होण्याआधी पाकिस्तान क्रिकेट संघाचा माजी खेळाडू वसीम अक्रमने एक भविष्यवाणी केली आहे.

२०२६ च्या टी-२० विश्वचषकासाठी भारत आणि पाकिस्तान एकाच गटात आहेत. भारत आणि पाकिस्तानचा सामना १५ फेब्रुवारी रोजी होणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर, गेल्या अनेक वर्षापासून भारतीय संघात सातत्याने सुधारणा झाली आहे, तर पाकिस्तानची कामगिरी घसरली आहे. याचकारणामुळे वसीम अक्रमने पाकिस्तान क्रिकेट संघाला आरसा दाखवला आहे. वसीम अक्रमने टी-२०मधील टॉप चार संघामध्ये पाकिस्तानचा समावेश केला नाही. भारतासह ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेचा संघ उपांत्य फेरीपर्यंत पोहचतील अशी भविष्यवाणी वसीम अक्रमने केली आहे.पाकिस्तानचा समावेश न करण्याचे मुख्य कारण- आयसीसी स्पर्धांमध्ये पाकिस्तानची अलिकडची कामगिरी निराशाजनक राहिली आहे, म्हणूनच वसीम अक्रमने त्याच्याच देशाच्या संघाला टॉप चार फेव्हरिटमध्ये समाविष्ट केले नाही. २०२४ च्या टी-२० विश्वचषकात, पाकिस्तान गट टप्प्यात बाहेर पडला होता,

**टी२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारताचा संपूर्ण संघ:**अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, सूर्यकुमार यादव (कर्णधार), अक्षर पटेल (उपकर्णधार), तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, इशान किशन, रिंकू सिंग, वॉशिंग्टन सुंदर, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, कुलदीप यादव, हर्षित राणा.



**अक्रमची भविष्यवाणी**

# लातूर शहर महानगरपालिका, लातूर निवडणूक २०२५-२६

**लातूर/प्रतिनिधी:** - लातूर शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ करिता एकूण मतदान केंद्र ३७५ आहे.

- लातूर शहर महानगरपालिकेचे मतदार संख्या ३,२१,३५४ आहे यात स्त्री १,६४,१५२ पुरुष १,५७,१७७ इतर २५ एकूण मतदार

**१) मनुष्यबळ -**

१) ३७५ मतदान केंद्रावर प्रत्यक्ष निवडणुक कामाकरीता एकूण १६५२ इतके कर्मचारी नेमणूक करण्यात आले आहे तसेच BLO व सहायक कर्मचारी सह २५०० कर्मचारी नियुक्त आहेत.

२) नियोजनासाठी २७ कक्ष स्थापन करण्यात आले

३) VST, FST, SST VVT, इत्यादी पथक कार्यान्वित आहेत.

४) १४.०१.२०२६ रोजी तिसरे प्रशिक्षण होईल व तदनंतर Poling Porty मार्गस्त होतील.

५) त्याकरीता Route Guide व वाहनांची व्यवस्था करण्यात आली आहे.

६) माहिती पुस्तिका, मतदान केंद्राचे नाव, शिपाई, BLO कर्मचार, आरोग्य कर्मचारी, SI यांचे संपर्क क्रमांक

**२) आरोग्य -**

१) सर्व मतदान केंद्रावर आरोग्य सेविका नियुक्त करण्यात आले आहे. तसेच प्रत्येक आरोग्य सेविकेकडे प्राथमिक तपासणी चे किट देण्यात आले.

२) तसेच दिव्यांगाकरीता मतदान केंद्रावर व्हील चेअर ची व्यवस्था करण्यात आले आहे.

३) मतदार स्लीप व QR कोड

लातूर शहर महानगरपालिका निवडणूकीत मतदान केद्र निहाय बी. एल. ओ ची नेमणूक करण्यात आली असून त्यांना मतदार स्लीप वाटणे कामी देण्यात आले आहे. सध्या त्यांचे काम पूर्णतःकडे आहे. तसेच मतदान केंद्र शोधणे करीता मताधिकार ॲप व Laturcity.in हे weblink व QR कोड दिला आहे. त्यात मोबाईल क्रमांक टाकल्यास Whatsup द्वारे वॉअर स्लीप मिळेल

**४) वाहन व्यवस्थापन -**

१) १३३ वाहने ( सिटी बस -७३) (क्रुझर - ६०) सर्ववाहनांना GPS बसविण्यात येईल.

२) ने करीता ४० वाहने

३) Sector petroling करीता पोलिस प्रशासनाला वाहने उपलब्ध करून



दिले.

४) मतदान केंद्र वाहतुक आराखडा (Trasport plan) तयार केला आहे.

५) Parking साठी Polytechnic समोरील मोकळा भुखंड वापरला जाणार आहे.

६) वाहतुक वळती करण्यात येत आहे.

५) जनजागृती कक्ष -

१) विविध Association यांच्या मार्फत सूरू

२) LED व्हॅन - जनजागृती

३) शाळा, महाविद्यालयांत जनजागृती

४) Bike,Rally, Zumba dance

निश्रि्चतपणे १००% मतदान होण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

६) MCC आचारसंहिता कक्ष-

१) आतापर्यंत २ गुन्हे दाखल

२) आज ५.३० वाजता प्रचार बंद होईल

**मतदान केंद्र परिसर (०-१०० मीटर क्षेत्र) संबंधित सूचना**

१. १०० मीटरच्या आत - मतदान करणारे मतदार व निवडणूक कर्मचारी वगळता इतर कोणालाही थांबता येणार नाही.

२. कोणतेही प्रचार साहित्य, झेंडे, बॅनर, पोस्टर किंवा चिन्ह १०० मीटरच्या आत दाखवणे कडक मनाई.

३. उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी (अधिकृत ओळखपत्र असलेले) सोडून इतर कुणालाही परिसरात अनावश्यक फिरता येणार नाही.

४.मतदान केंद्राच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ गर्दी करणे मनाई.

उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्यासाठी सूचना

६. प्रत्येक उमेदवाराने २०० मीटरच्या बाहेर ओपन पंडॉल / हेल्प डेस्क लावू शकतो परंतु त्यावर बॅनर, पोस्टर राहणार नाहीत.

७. त्या पंडॉलमध्ये फक्त दोन खुर्च्या व एक टेबल ठेवण्याची परवानगी आहे.

८. पंडॉलमध्ये जास्तीचे व्यक्ती बसविणे, जमाव करणे किंवा प्रचार करणे मनाई.

९. उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी मतदान केंद्राच्या आत जास्त वेळ थांबू शकत नाहीत.

१०. केंद्रात प्रवेश करताना अधिकृत ओळखपत्र असणे आवश्यक.

११. प्रतिनिधीने मतदारांवर कोणत्याही प्रकारचा प्रभाव, दबाव किंवा प्रलोभन निर्माण करता कामा नये.

---

**मतदारांबाबत सूचना**

१२. मतदारांनी स्वतःची ओळखपत्रे/मान्य कागदपत्रे सोबत ठेवावीत.

१३. मतदान करताना शांतता पाळावी व अनावश्यक चर्चा/वाद टाळावे.

१४. मतदान केंद्रात मोबाईल वापरणे, फोटो काढणे टाळावे.

१५. कोणत्याही प्रकारचा ओळख चिन्ह/प्रचार चिन्ह परिधान करून मतदान केंद्रात येऊ नये.

---

**वाहतूक व पार्किंग नियम**

१६. १०० मीटरच्या आत कोणतेही वाहन पार्क करणे कडक मनाई.

१७. रस्ते, प्रवेशमार्ग, शाळा/इमारत परिसर ब्लॉक होणार नाहीत याची सर्वांनी खबरदारी घ्यावी.

१८. मतदान केंद्राजवळ बाईक/गाडी उभी करून जमाव करणे प्रतिबंधित.

---

**स्थानिक दुकाने, घरे व व्यावसायिकांसाठी सूचना**

१९. १०० मीटरच्या आत असणारी दुकाने किंवा घरे मतदानात कोणताही अडथळा निर्माण करणार नाहीत.

२०. दुकानातून किंवा घरातून कोणत्याही पक्षाच्या प्रचाराचा आवाज अथवा चिन्ह दिसणार नाही याची दक्षता घ्यावी.

२१. मतदान प्रक्रियेत अडथळा होईल असे संगीत, ध्वनीप्रसारक वापरणे टाळावे.

**कायद्याशी संबंधित सूचना**

२२. वरिल कोणत्याही नियमांचे उल्लंघन झाल्यास आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन समजून कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

२३. गैरप्रकार करणाऱ्याविरुद्ध प्रचलित कायद्यानुसार गुन्हा दाखल केला जाईल.

२४. पोलिस अधिकारी व निवडणूक अधिकारी यांच्या सूचना बंधनकारक असतील.

**अतिरिक्त सूचना (सुरक्षा व शिस्त)**

२५. मतदान केंद्राजवळ दारू, सिगारेट, तंबाखू सेवन मनाई.

२६. जोरात बोलणे, भांडण, वाद-विवाद टाळावेत - कायदेशीर कारवाई होऊ शकते.

२७. मतदान केंद्र परिसरात उउढत / व्हिडिओ रेकॉर्डिंग सुरू असू शकते; सर्वांनी नियमांचे पालन करावे.

२८. कोणीही फेक न्यूज, चुकीची अफवा पसरवणे किंवा सोशल मीडियाद्वारे गोंधळ निर्माण करणे मनाई.

२९. अपंग व ज्येष्ठ नागरिकांना प्राथमिकता देण्यात येईल; सहकार्य करावे.

३०. रांग व्यवस्थापनासाठी अधिकाऱ्यांच्या निर्देशांचे पालन करणे अनिवार्य.

लोकप्रतिनिधी (आमदार, खासदार, मंत्री) यांच्यासाठी प्रवेश नियम

३१. आमदार, खासदार, मंत्री किंवा कोणतेही लोकप्रतिनिधी - जर त्यांचे मतदान त्या केंद्रावर नसेल, तर त्यांना मतदान केंद्रात किंवा १०० मीटरच्या आत प्रवेश करण्यास परवानगी नाही.

३२. लोकप्रतिनिधींचे पद काहीही असले तरी, निवडणूक आयोगाचे नियम सर्वांसाठी समान लागू राहतात.

३३. फक्त त्यांचे स्वतःचे मतदान त्या केंद्रावर असल्यास ते केंद्रात प्रवेश करू शकतात, तेही फक्त मतदान करण्यापुरते.

७) Webcasting कक्ष-

१) एकुण ९९ संवेदनशील केंद्र व उर्वरीत बहुकेंद्र असलेले ठिकाणी बाहेरच्या बाजुस ५१ असे एकुण १५० ठिकाणी Webcasting सुविधा होणार आहे.

२) Cantrol Room तयार केली आहे व Ro office निहाय Access दिला आहे.

**८) भोजन कक्ष-**

मतदान केंद्र अधिकारी कर्मचारी यांना पाणी जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यासाठी १८ पथके नियुक्ती केली आहेत.

**९) टपाली मतदान -**

४०२ अधिकारी कर्मचारी यांचे अर्ज प्राप्त पैकी २७८ मतदारांचे मतदान हे ९.१.२०२६ रोजी झाले. उर्वरीत कर्मचा-यांना उदया दिनांक १४.०१.२०२६ रोजी साहित्य वाटप ठिकाणी सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

१) EVM ची सिलींग दिनांक ०७.०१.२०२६ व ०८.०१.२०२६ रोजी पुर्ण झाले आहे.

२) दिनांक १४.०१.२०२६ ते १६.०१.२०२६ करीता इक्एड मार्फत तज्ञ ३ मास्टर ट्रेनर आयोगाकडुन उपलब्ध झाले आहेत.

३) साहित्य वाटप दिनांक १४.०१.२०२६ रोजी सकाळी महिला तंत्रनिकेतन येथे होणार आहे. व स्वीकृती दिनांक १५.०१.२०२६ रोजी सायंकाळी त्याच ठिकाणी होणार आहे.

**११) मतदान केंद्र**

**आर्दश मतदान केंद्र - ६**

१) झोन क्र.अ प्रभाग क्र.१५ पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, मतदान केंद्र क्र.१५/१

२) झोन क्र.ब प्रभाग क्र.१७ बांधकाम भवन सार्वजनिक बांधकाम विभाग, मतदान केंद्र क्र.१७/२

३) झोन क्र.ब प्रभाग क्र.१८ राजश्री शाहु ज्युनिअर सायन्य कॉलेज, मतदान केंद्र क्र.१८/२

४) झोन क्र.ड प्रभाग क्र.२ कृपासदन शाळा, मतदान केंद्र क्र.२/५

५) झोन क्र.अ प्रभाग क्र.१० कॉक्रीस कॉलेज, मतदान केंद्र क्र.१०/३

६) झोन क्र.ड प्रभाग क्र.७ यशवंत विदयालय नांदेड रोड, मतदान केंद्र क्र.७/४

**सखी मतदान केंद्र - ३**

१) झोन क्र.ब प्रभाग क्र.१७ बांधकाम भवन सा.बां.उपविभाग इमारत, मतदान केंद्र क्र.१७/१

२) झोन क्र.ब प्रभाग क्र.१५ आय टी आय कॉलेज, मतदान केंद्र क्र.१५/३

३) झोन क्र.क प्रभाग क्र.४ मनपा उर्दु शाळा क्र.१३, मतदान केंद्र क्र.४/२

**पर्यावरण पुरक मतदान केंद्र -२**

१)झोन क्र.ब प्रभाग क्र.१८ चन्नाबसवेश्वर कॉलेज मतदान केंद्र क्र.१८/१

२) झोन क्र.अ प्रभाग क्र.१३ ज्ञानप्रकाश विदयानिकेतन प्रकाश नगर, मतदान केंद्र क्र.१३/७

मतदान केंद्रावर पाण्याची सुविधा, विदयुत,फर्निचर,मंडप, रॅम्प, स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यात आले आहे.

मतदान केंद्राचे नाव,प्रभाग क्रमांक व बुध क्रमांक चे नाव टाकणे पुर्ण झाले आहे.

**१२) स्टाँग रूम**

६ ठज करिता ६ स्टाँग रूम तयार करण्यात आले आहे. त्याठिकाणी बॅरीकेटींग व फर्निचर सुविधासह पोलीस बंदोबस्त ठेवला आहे व तसेच सी.सी.टी. व्ही. व्यवस्था झाली आहे.

स्टेशनरी छपाई प्रिंटींगचे काम पुर्ण झाले असुन सर्व साहित्य ठज ना देण्यात आले आहे.

**१३) माहीती व जनसंपर्क कक्ष-**

माहीती व जनसंपर्क कक्षामार्फत आयोगाच्या मार्गदर्शक सुचना नुसार पत्रकारांना मतमोजणी दरम्यान पासेस दिले जाणार आहेत. तसेच सभागृह महिला तंत्रनिकेतन येथे मतमोजणी दरम्यान पत्रकारांसाठी कक्ष राखीव ठेवण्यात आले आहेत.

**१४) मतमोजणी केंद्र -**

१) महिला तंत्रनिकेतन येथे ६ ठज मार्फत मतमोजणी १६.०१.२०२६ रोजी होईल त्याठिकाणी ६ कक्ष तयार केले आहेत.

२) प्रभाग निहाय मतमोजणी होणार आहे.


३) उमेदवार प्रतिनिधी यांना ओळखपत्र RO मार्फत देण्यात येत आहे.

४) मतमोजणी ठिकाणी शासकीय वाहने सोडण्यात येतील.

५) उर्वरीत वाहने समोरील पार्कींगच्या ठिकाणी राहतील.

## दयानंद विज्ञानच्या सृष्टी जगताप या माजी विद्यार्थीनीने केले शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी:** सलग १२७ तास नृत्य करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नाव नोंदवून दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे नावलौकिक केलेली माजी विद्यार्थीनी सृष्टी जगताप हिने शंभर टक्के मतदान करण्याचे आवाहन केले. ती असे म्हणाले की,लातूर महानगरपालिका निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी,युवकांनी शंभर टक्के मतदान करावे,नव मतदारांनी मतदानाचा हक्क बजवावा आणि संविधानाने दिलेल्या अधिकाराचा वापर करून माझं मत माझं लातूर असा संकल्प करून शंभर टक्के मतदान करून लोकशाहीचा कणा मजबूत करीत लातूर पॅटर्न घडवूया असे आवाहन केले.दयानंद विज्ञानचे माजी व आजी विद्यार्थी मतदान जनजागृती अभियानात सक्रिय सहभाग नोंदवितात याचा सार्थ अभिमान महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे,उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे, पर्यवेक्षिका डॉ. संध्या कोल्हे, पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरुडकर, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ भालेराव सर्वांना आहे.



## श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त मैदानावर भव्य श्रमदान

### नांदेड येथील हिंद-दी-चादर कार्यक्रमात सहभागी होण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन



नांदेड,(प्रतिनिधी)- :- श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथील असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (मोदी मैदान) येथे भव्य धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम सिख धर्माच्या मर्यादा व परंपरांचे पालन करून पार पडणार आहे.

कार्यक्रमाच्या कालावधीत सदर मैदानावर गुरुद्वारा प्रतिकृती (दरबार साहिब) असणार असल्याने भाविकांना चप्पल अथवा बूट न वापरता अनवाणी प्रवेश करावा लागणार आहे. त्यामुळे भाविकांना चालताना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या उपस्थितीत विशेष श्रमदान उपक्रम राबविण्यात आला.

या श्रमदानात नांदेड जिल्ह्यातील सुमारे १,५०० विद्यार्थी, कॅडमीचे ५०० विद्यार्थी महापालिकेचे कर्मचारी तसेच विविध शासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले. श्रमदानाद्वारे मैदानावरील खडे वेचून परिसर स्वच्छ करण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्र्यांचे विशेष कार्य अधिकारी रामेश्वर नाईक, क्षेत्रीय धर्मजागरण समितीचे प्रमुख महेंद्रजी रायचुरा, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अमोल इंगळे, तहसीलदार आनंद देवूळगावकर, शिक्षणाधिकारी माधव सलगर, रेडक्रॉसचे हर्षद शहा, मनपा अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पांचगे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमात खालसा हायस्कूल, राजर्षी पब्लिक स्कूल, नागार्जुना हायस्कूल, सचखंड पब्लिक स्कूल यांसह पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण घेणारे विद्यार्थी, विविध एनजीओ, सोल्जर कॅडमी, तोटेवाड फिजिकल कॅडमी, नांदेड फिजिकल व गरुडा फिजिकल कॅडमीच्या विद्यार्थ्यांनी या श्रमदानात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला.

या श्रमदानातून गुरुप्रती सेवा, समर्पण व प्रेमाची अनुभूती अनुभवास मिळाली. नांदेड येथे सिख धर्मियांचे एक महत्त्वाचे तख्त असल्याने या शहीदी समागम कार्यक्रमाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या कार्यक्रमात विविध धर्म व समुदायांचे भाविक सहभागी होणार आहेत. तरी सर्वांनी नांदेड येथे होणाऱ्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी केले.

येणाऱ्या भाविकांना अनवाणी चालताना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी असर्जन परिसरातील मोदी मैदान पूर्णतः स्वच्छ करण्यात आले. या उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन सेवाभावातून श्रमदान केले, याबाबत विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

## जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणाचा तपास गतीने सुरु

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना हाती; समुपदेशक नियुक्त करणार
### समाज कल्याण विभागामार्फत विद्यार्थिनीच्या कुटुंबाला ४ लाख रुपयांचे सहाय्य मंजूर

**लातूर/प्रतिनिधी:** येथील जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यू प्रकरणामध्ये पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासनामार्फत आवश्यक कार्यवाही गतीने केली. या प्रकरणात प्राप्त तक्रारीनंतर पोलिसांकडून पारदर्शक तपास सुरु करण्यात आला. या तपासाच्या आधारे विद्यालयातील दोन कर्मचाऱ्यांवर भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांसह अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम, १९८९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हे दोन्ही कर्मचारी ते सध्या कोठडीत आहेत. तसेच विद्यार्थिनीच्या कुटुंबियांना समाज कल्याण विभागामार्फत ४ लाख रुपयांचे सहाय्य मंजूर करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना हाती घेण्यात आल्या असून विद्यालयामध्ये समुपदेशक नियुक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे व पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रकरण गांभीर्याने हाताळले जात आहे. या दुःखद घटनेत मुलीच्या कुटुंबियांना तात्काळ मदत म्हणून समाज कल्याण विभागामार्फत ४ लाख रुपयांचे अर्थसहाय्य मंजूर करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे, पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांनीही जवाहर नवोदय विद्यालयाला भेट देवून विद्यार्थी, पालकांशी संवाद साधला असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना तातडीने अमलात आणण्याचे निर्देश जवाहर नवोदय प्रशासनाला दिले आहेत. विद्यार्थी सुरक्षिततेच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांनी जवाहर नवोदय विद्यालय समितीच्या पुणे विभागीय सहायक आयुक्त पंकज जॅक्सन, प्राचार्य गणपती म्हस्के यांची बैठक घेवून सूचना केल्या आहेत. यावेळी विद्यार्थ्यासाठी समुपदेशक नियुक्तीची कार्यवाही करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या दुर्दैवी मृत्यूबाबत तक्रार दाखल होताच पोलिसांनी कोणताही विलंब न करता तपासाची चक्रे तात्काळ फिरवली. प्राथमिक तपासात निष्पन्न झालेल्या पुराव्यांच्या आधारे पल्लवी सचिन कणसे, लता दगडू गायकवाड यांना अटक करण्यात आली. या अनुषंगाने जबाब नोंदविणे, पुरावे जमा करणे यासाठी विशेष पथक स्थापन करण्यात आले. या अत्यंत संवेदनशील प्रकरणाची लातूर जिल्हा प्रशासन व लातूर पोलिसांनी तात्काळ दखल घेत, पीडित कुटुंबाला न्याय मिळावा, गुन्ह्यातील कोणताही दोषी सुटू नये, यासाठी आवश्यक कार्यवाही सुरु आहे. लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी समीर साळवे यांच्या विशेष पथकाकडून या प्रकरणाचा तपास करण्यात येत आहे.

## विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयाचा बाह्यरुग्ण विभाग १५ जानेवारी रोजी बंद राहणार

**लातूर/प्रतिनिधी:** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक मतदानादिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याने विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील बाह्यरुग्ण विभाग गुरुवार, १५ जानेवारी २०२६ रोजी बंद राहील. तसेच शुक्रवार, १६ जानेवारी २०२६ पासून बाह्यरुग्ण विभाग (ओ.पी.डी.) नियमित वेळेप्रमाणे सुरु राहील, असे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन जाधव यांनी कळविले आहे. तसेच रुग्णालयाची आपत्कालीन सेवा २४ तास सुरु राहील.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# आंबेडकर विचारमंचचे राजमाता जिजाऊंना अभिवादन




धाराशिव (प्रतिनिधी)- डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंच धाराशिवच्या वतीने राजमाता जिजाऊ यांच्या जयंती निमित्ताने धाराशिव येथील जिजाऊ चौकात अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारमंचचे अध्यक्ष प्रा. रवि सुरवसे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक राजेंद्र धावारे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी राजमाता जिजाऊ यांचा विजय असो, तुमचं आमचं नात काय, जय जिजाऊ जय शिवराय असा जयघोष करण्यात आला.

यावेळी प्रा. रवि सुरवसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त विजय गायकवाड, राजेंद्र धावारे, एम.जी. पवार, सी.के. मस्के, विकास काकडे, अमोल गडबडे, ड. अजित कांबळे, प्रा. अंबादास कलासरे इत्यादींची उपस्थिती होती.

# धाराशिवच्या राजकारणाचा केंद्रबिंदू - नुसते आमदार नाही, तेच 'पावर सेंटर' म्हणजे राणा दादा पाटील



धाराशिव ( रामेश्वर डोंगरे ) जिल्ह्याच्या राजकारणात आज एकच वास्तव स्पष्टपणे दिसून येते, निर्णय जिथे होतात. दिशा तिथून ठरते आणि सत्ता जिथे केंद्रित होते ते ठिकाण म्हणजे आमदार राणा दादा पाटील! ते केवळ एक आमदार नाहीत तर संपूर्ण जिल्ह्या च्या राजकारणाचे पॉवर सेंटर म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली आहे. प्रशासन असो किंवा राजकीय रणनीती प्रत्येक महत्त्वाच्या घडामोडीवर राणा दादा पाटील यांची ठाम पकड आहे.जिल्ह्यातील विकास कामांना गती देणे, रखडलेले प्रकल्प मार्गी लावणे, निधी मंजुरीसाठी ठोस पाठपुरावा करणे आणि जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणे या प्रत्येक बाबतीत त्यांची कार्यशैली ठळकपणे जाणवते. चालू मुद्द्यावर थेट भूमिका घेणे, सध्या धाराशिव जिल्ह्यात आरोग्यसेवा रस्ते ग्रामीण विकास युवकाचा प्रश्न पाणीटंचाई आणि महिलांच्या सक्षमीकरणाचे मुद्दे केंद्रस्थानी असताना या प्रत्येक विषयावर राणा दादा पाटील स्वतः लक्ष घालत आहेत. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बैठका कामाची थेट पाहणी आणि वेळेत निर्णय यामुळे अनेक प्रश्न मार्गी लागताना दिसत आहेत. राजकीय ताकद म्हणजे केवळ पद नव्हे तर निर्णय घेण्याची क्षमता! जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांची निष्ठा आणि ही तिन्ही ताकद राणा दादा पाटील यांच्या नेतृत्वात स्पष्टपणे दिसून येते. कार्यकर्त्यांवर पूर्ण विश्वास ठेवून काम सोपवणे आणि काम पूर्ण झाल्याशिवाय शांत न बसणे हीच त्यांची ओळख आहे. विरोधक असो या मित्रपक्ष सर्वांनाच एक गोष्ट मान्य आहे की, धाराशिवच्या राजकारणात राणा दादा पाटील यांच्याशिवाय कोणताही मोठा निर्णय पूर्ण होत नाही, हीच त्यांची खरी राजकीय उंची दर्शविते. गावागावात थेट संपर्क ,प्रत्येक मतदाराशी आपुलकीचे नाते आणि हा आमचा माणूस आहे अशी भावना निर्माण करणारे नेतृत्व यामुळे राणा दादा पाटील आज जनतेच्या मनात घर करून बसले आहेत. आज धाराशिव जिल्ह्याच्या राजकारणाचा केंद्रबिंदू एकच आहे, नुसते आमदार नाहीत तेच पॉवर सेंटर म्हणजे राणा दादा पाटील होय!

# पोदार मध्ये राजमाता जिजाऊ माँसाहेब व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी



धाराशिव (प्रतिनिधी)- पोदार इंटरनॅशनल स्कूल धाराशिव मध्ये स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता मा जिजाऊ साहेब व युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन करून करण्यात आली.

या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता आठवी च्या विद्यार्थ्यांनी व त्यांचे वर्गशिक्षक पांडुरंग बिराजदार सर यांनी केले. या कार्यक्रमासाठी स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर, उपप्राचार्य निलेश जाधव सर, व्यवस्थापकीय श्री जीवन कुलकर्णी सर, उप व्यवस्थापकीय अधिकारी श्री प्रदीप शिंदे सर, वरिष्ठ समन्वयक श्री प्रभाकर चौधरी सर, कार्यक्रमाधिकारी दीपक अंकुश सर हे देखील उपस्थित होते. राजमाता मा जिजाऊ साहेब आणि स्वामी विवेकानंद यांच्या वेशभूषेत विद्यार्थ्यांनी सादरीकरण अतिशय देखण्या स्वरूपात केले. यावेळी स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर उपस्थित त्यांना मार्गदर्शन देखील केले. या कार्यक्रमाला पालक वर्ग देखील मोठ्या प्रमाणात उपस्थित होता.

# मनरेगासाठी जिल्हा काँग्रेस रस्त्यावर: घोषणांनी दणाणला परीसर

धाराशिव केंद्र सरकार महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या नावात बदल करून ती योजना व्हीबी- जीराम-जी योजना लागू केली जात आहे. नावातून गांधीजींचे नावच काढून टाकले जात आहे. असा आरोप करत जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवारी जिल्हा कचेरी कार्यालयासमोर केंद्र सरकारच्या विरोधात धरणे आंदोलन करण्यात आले. या वेळी केंद्र सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

केंद्र सरकार मनरेगा योजनेचे नाव बदलून व्हीबी-जीराम-जी योजना लागू केली जाणार आहे. या निर्णयाविरोधात देशभरात काँग्रेस पक्ष आक्रमक झाला आहे. धाराशिव येथे शुक्रवारी जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने दुपारी १२:३० वाजता जिल्हा कचेरीसमोर धरणे आंदोलन करण्यात आले. मनरेगा बचाव देश बचाव, मनरेगा कायदा रद्द करणाऱ्या भाजप सरकारचा धिक्कार असो, मजुराच्या रोजगारावर गदा आणणाऱ्या भाजप सरकारचा धिक्कार असो, धिक्कार असो धिक्कार असो भाजप सरकारचा धिक्कार असो, मनरेगा वाचवा, देश वाचवा अशा घोषणांनी जिल्हा कचेरी परिसर दणाणून गेला. मनरेगा योजना रद्द करण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याबाबत केंद्र सरकारला निर्देश द्यावेत, अशी मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले. आंदोलनात जिल्हाध्यक्ष अॅड. धीरज पाटील, राज्याचे सहप्रभारी रेहना चिस्ती, सर्फराज काझी, विश्वास शिंदे, खलील सय्यद आदीसह पदाधिकारी, कार्यकर्ते आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# कोठाळवडी येथून मोटारसायकलची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी पांडुरंग शिवाज सुर्यवंशी, वय ३८ वर्षे, रा. कोठाळवडी ता. कळंब जि. धाराशिव यांची अंदाजे ४५,०००किंमतीची हिरो मोटरसायकल ही दि.१७.१२.२०२५ रोजी २३.०० ते दि.१८.१२.२०२५ रोजी ०२.०० वा. सु. साई वडापाव हॉटेल समोर कळंब बसस्थानक जवळून चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-पांडुरंग सुर्यवंशी यांनी दि.१०.०१.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**लातूर समाचार धाराशिव**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**

# लाथाबुक्यांनी, दगडाने मारहाण करुन जखमी केले

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत राजेंद्र, ज्ञानदेव रा. भोत्रा ता.परंडा जि. धाराशिव यांनी दि.१२.०१.२०२६ रोजी शेत गट नं २० (अ)मध्ये भोत्रा शिवार येथे फिर्यादी धुळदेव आबा शिंदे, वय ३९ वर्षे, रा.भोत्रा ता. परंडा जि. धाराशिव यांना नमुदांन्रनी शेतातील बांध कोरल्याच्या कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, दगडाने मारहाण करुन जखमी केले. तसेच फिर्यादीचा मुलगा सुरज व भाउ ब्रम्हदेव यांनाही शिवीगाळ करुन धमकी दिली. प्रथम खबरेवरुन पो ठाणे परंडा येथे ुन्हा नोंदवला आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग कामे**

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामासाठी पात्र निविदाकारांकडून ऑनलाइन खुल्या ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा सूचना क्रमांक: SUR-NC-CR-SNT-C-S-01-2026 दिनांक १०-०१-२०२६. कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या पुणे विभागामध्ये ५ स्टेबलिंग लाईनच्या तरतुदीच्या संबंधात साईनगर शिर्डी स्टेशनवर इनडोअर आणि आउटडोअर उपकरणांचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे आणि इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगची तरतूद करणे. **कामाची अंदाजित किंमत:** १३,८९,१५,२३८.०८ (रुपये तेरा कोटी एकोणनव्वद लाख पंधरा हजार दोनशे अडतीस आणि आठ पैसे फक्त). **निविदा फॉर्म/पुस्तिकेची किंमत:** ०.००. **बयाणा रक्कम:** ८,४४,६००/- (रुपये आठ लाख चव्वेचाळीस हजार सहाशे फक्त). **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** कार्यादेश (LOA) जारी केल्याच्या तारखेपासून ०८ महिने (आठ महिने). यामध्ये पावसाळा आणि कापणीचा कालावधी समाविष्ट आहे. **निविदा सादर करण्याची सुरुवातीची तारीख: २०-०१-२०२६. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: ०३.०२.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: ०३.०२.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत.** निविदेचा संपूर्ण तपशील उपलब्ध असलेली वेबसाइट: **www.ireps.gov.in**

**सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) मध्य रेल्वे, सोलापूर**
Akar/Sur-1
आपल्या पाळीव प्राण्यांना रेल्वे मार्गापासून दूर ठेवा

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**सिग्नलिंग कामे**

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) मध्य रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, खालील कामासाठी पात्र निविदाकारांकडून ऑनलाइन खुल्या ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा सूचना क्रमांक: SUR-NC-CR-SNT-C-S-02-2026 दिनांक ११-०१-२०२६. कामाचे नाव:** सोलापूर विभागातील मध्य रेल्वेच्या सोलापूर-उस्मानाबाद नवीन ब्रॉडगेज मार्गाच्या संबंधात, उस्मानाबाद ते तुळजापूर दरम्यान ३ स्थानकांवर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंगच्या तरतुदीसाठी इनडोअर आणि आउटडोअर उपकरणांचा पुरवठा, स्थापना, चाचणी आणि कार्यान्वित करणे, उस्मानाबाद येथील RRI मध्ये बदल काम आणि उस्मानाबाद ते तुळजापूर दरम्यान ४ स्थानकांवर आउटडोअर सिग्नलिंग कामे. **कामाची अंदाजित किंमत:** २५,७७,७९,६७६.१९ (रुपये पंचवीस कोटी सत्याहत्तर लाख एकोणऐंशी हजार सहाशे शहात्तर आणि एकोणीस पैसे फक्त). **निविदा फॉर्म/पुस्तिकेची किंमत:** ०.००. **बयाणा रक्कम:** १४,३८,९००/- (रुपये चौदा लाख अडतीस हजार नऊशे फक्त). **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** कार्यादेश (LOA) जारी केल्याच्या तारखेपासून १२ महिने (बारा महिने). यामध्ये पावसाळा आणि कापणीचा कालावधी समाविष्ट आहे. **निविदा सादर करण्याची प्रारंभ तारीख: २६-०१-२०२६. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ: ०९.०२.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत. निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ: ०९.०२.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत.** निविदेचा संपूर्ण तपशील उपलब्ध असलेली वेबसाइट: **www.ireps.gov.in**

सहाय्यक विभागीय सिग्नल आणि दूरसंचार अभियंता (बांधकाम) मध्य रेल्वे, सोलापूर
Akar/Sur-2
आपल्या पाळीव प्राण्यांना रेल्वे मार्गापासून दूर ठेवा

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ चे यशस्वी आयोजन
## उद्योग-शासन-नवोन्मेष यांचा प्रभावी संगम




धाराशिव (जिमाका)- राज्यातील नवउद्योजक,उद्योग क्षेत्र आणि शासकीय यंत्रणांमधील समन्वय अधिक दृढ करण्याच्या उद्देशाने इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ चे यशस्वी आयोजन जिल्हा उद्योग केंद्राच्या वतीने करण्यात आले. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यावेळी अध्यक्षस्थानी होते.

जिल्हाधिकारी श्री.पुजार उपस्थित उद्योजकांना मार्गदर्शन करताना म्हणाले की,भूम व परंडा तालुक्यातील उत्पादित केळी व तुळजापूर तालुक्यातील द्राक्ष हे कृषी उत्पादने निर्यात होत असून त्यासोबतच उद्योग घटकांकडून प्रक्रिया केलेले उत्पादने निर्यात होणे आवश्यक असल्याचे सांगितले.तसेच जिल्ह्यातील बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालासाठी आता ऑनलाइन पोर्टल तयार करण्यात आलेले असून गटांनी उत्पादित केलेल्या माल विक्रीस मोठ्या प्रमाणात वाव मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या कार्यशाळेमध्ये जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी श्री.राजकुमार मोरे यांनी कृषी माल प्रक्रिया व निर्यात याबाबत सविस्तर माहिती दिली.समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त सचिन कवले यांनी अनुसूचित जाती जमातीमधील उद्योजकांसाठी विशेष सवलती असून त्यांनी या योजनेच्या माध्यमातून उद्योजक होण्याचे आवाहन केले.

कौशल्य विभागाचे सहाय्यक आयुक्त श्री.संजय गुरव यांनी जिल्ह्यातील उद्योजकांसाठी पूरक असणारे कुशल मनुष्यबळ उद्योजकांच्या मदतीने तयार करण्यात येत असल्याचे सांगितले. डीजीएफटीच्या प्रियंका गवई यांनी आयात निर्यात कार्यपद्धती अत्यंत सोप्या भाषेत सांगून जास्तीत जास्त परकीय चलन मिळविण्यासाठी निर्यातीकडे वळणे आवश्यक असल्याचे सांगितले. डीजीएफटीच्या वेबसाईटवर निर्यात बंधू हे प असून ते अत्यंत प्रभावी असे माध्यम आहे.तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या पचा वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले.

भारतीय डाकचे श्री.सोनटक्के,न्यू इंडिया इन्शुरन्सच्या श्रीमती मालती भोसले, उद्योजक संघटनेचे श्री.कोंढारे व विभागीय कार्यालयाचे उद्योग उपसंचालक श्री.भोंबे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले तसेच अपेडाचे श्री.प्रशांत वाघमारे व इज ऑफ डूइंग बिजनेसबाबत मैत्रीचे श्री.हजारे यांनी उपस्थिताना ऑनलाईन मार्गदर्शन केले.

प्रास्ताविकतातून जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक श्री.अमोल बळे यांनी जिल्ह्यातील उद्योजकता व निर्यात वाढीसाठी शासनाकडून विविध योजनेच्या माध्यमातून करण्यात येत असलेल्या प्रयत्नांबाबतची माहिती दिली.

स्टार्टअप्स,एमएसएमई,मोठे उद्योगसमूह, धोरणकर्ते,तंत्रज्ञान तज्ज्ञ तसेच प्रशासकीय अधिकारी यांचा सक्रिय सहभाग लाभला. नवोन्मेष,उद्योजकता आणि रोजगारनिर्मिती यांना चालना देणे हा या कार्यशाळेमागील मुख्य हेतू होता. नव्या कल्पनांना उद्योगात रूपांतर करण्यासाठी आवश्यक असलेली धोरणात्मक मदत,वित्तपुरवठा, कौशल्यविकास आणि तंत्रज्ञान यावर सखोल चर्चा करण्यात आली.

या कन्व्हेंशनमध्ये विविध सत्रांद्वारे स्टार्टअप्सना येणाऱ्या अडचणी,शासनाच्या विविध योजना,अनुदाने, कर्जसुविधा तसेच उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.[illegible],उद्योग विभाग तसेच इतर संबंधित संस्थांच्या प्रतिनिधींनी उपस्थितांना माहिती दिली आणि प्रश्नोत्तराच्या माध्यमातून शंकांचे निरसन केले.

तंत्रज्ञान,कृत्रिम बुद्धिमत्ता,डिजिटल सेवा,हरित ऊर्जा,कृषी-आधारित उद्योग आणि उत्पादन क्षेत्रातील संधी यावर विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले.या सत्रांमुळे उद्योजकांना भविष्यातील संधी आणि आव्हाने यांचा अंदाज आला.

या कार्यक्रमामुळे नवउद्योजकांना प्रेरणा मिळाली असून उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन एकाच व्यासपीठावर उपलब्ध झाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.शासन आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील समन्वय अधिक बळकट होऊन राज्याच्या औद्योगिक विकासाला गती मिळेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.इग्नाईट कन्व्हेंशन २०२६ हे केवळ परिषद न राहता, उद्योजकांसाठी दिशा दाखवणारे आणि नवोन्मेषाला चालना देणारे एक प्रभावी व्यासपीठ ठरले आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649